रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक १६२
www.ramprahar.com

◆ सोमवार, २९ डिसेंबर २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

पोपटी खवय्यांना गावठी वालाची प्रतीक्षा/२
माणगावच्या हर्ष चोगलेची भारतीय सैन्यात निवड/५
द. आफ्रिकेविरुद्ध मालिकेसाठी वैभव सूर्यवंशीकडे धुरा/८

### भाजपकडून तेजस्वी घोसाळकरांना उमेदवारी; आज भरणार अर्ज



**मुंबई :** महाराष्ट्राचे लक्ष लागलेल्या मुंबई महापालिका निवडणुकीसाठी उमेदवारांची नावे आता समोर येण्यास सुरुवात झाली आहे. भाजप आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची शिवसेना मुंबईत एकत्र निवडणूक लढवणार आहेत. या दोन पक्षांच्या जागावाटपाचे सूत्र जवळपास निश्चित झाले असून लवकरच उमेदवारांची अधिकृत यादी जाहीर होणार आहे. तत्पूर्वीच काही उमेदवारांनी स्वतःच्या सोशल मीडिया अकाऊंटवरून उमेदवारी अर्ज दाखल करत असल्याची माहिती दिलीय. यामध्ये नुकतेच शिवसेना उबाठातून भाजपमध्ये प्रवेश केलेल्या तेजस्वी घोसाळकर सोमवारी (दि. २९) दहिसर-वॉर्ड क्रमांक २मधून उमेदवारी अर्ज भरणार आहेत. याशिवाय मलबार हिल मतदारसंघातील वॉर्ड क्र. २१५मधून संतोष ढाले, २१८ स्नेहल तेंडुलकर, २१४ अजय पाटील, तर २१९मधून सन्नी सानप यांचे नाव समोर आले आहे.

# नव्या आशा, आकांक्षासह देश सज्ज

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

२०२५ या सरत्या वर्षाने भारताला मोठा आत्मविश्वास दिला असून आता देश २०२६मध्ये नवी आशा आणि नव्या संकल्पांसह पुढे जाण्यासाठी सज्ज असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे. ते रविवारी (दि. २८) आकाशवाणीवर मन की बात या कार्यक्रमातून देशवासीयांशी संवाद साधत होते. २०२५ या वर्षाने प्रत्येक भारतीयाला अभिमान वाटायला लावणारे क्षण दिल्याचे पंतप्रधान मोदींनी या वेळी सांगितले.

पंतप्रधान मोदी म्हणाले, सरत्या वर्षातील ऑपरेशन सिंदूर प्रत्येक भारतीयासाठी अभिमानाचे प्रतीक बनले असून आजचा भारत आपल्या सुरक्षेशी कोणतीही तडजोड करत नाही, हे जगाने पाहिले आहे. वंदे मातरम्‌ने १५०वा वर्धापन दिन साजरा केला, तेव्हाही देशवासीयांमध्ये उत्साह दिसून आला.

क्रीडा क्षेत्रासाठी २०२५ हे वर्ष संस्मरणीय ठरल्याचे नमूद करून पंतप्रधान मोदींनी भारताच्या पुरुष क्रिकेट संघाने जिंकलेली आयसीसी चॅम्पियन्स करंडक स्पर्धा, महिला क्रिकेट संघाचे पहिलेवहिले विश्वजेतेपद, दृष्टीहीन महिला क्रिकेट संघाने जिंकलेली पहिली टी-२० विश्वचषक स्पर्धा या यशाचा गौरवपूर्ण उल्लेख केला.



### ▪ 'मन की बात'मधून पंतप्रधान मोदींचा संवाद
### ▪ सरत्या वर्षाचा आढावा अन् नववर्षाचा संकल्प

वर्षाच्या सुरुवातीला प्रयागराज महाकुंभाने संपूर्ण जगाला आश्चर्यचकित केले, तर वर्षाच्या शेवटी अयोध्येतील राम मंदिरात झालेल्या ध्वजारोहण समारंभाने प्रत्येक भारतीयाचा ऊर अभिमानाने दाटून आल्याचे पंतप्रधान मोदींनी नमूद केले.

आज जग भारताकडे मोठ्या आशेने पाहत आहे. या आशेचे सर्वात मोठे कारण म्हणजे आपले तरुण. विज्ञान क्षेत्रातील आपले यश, नवीन नवोपक्रम आणि तंत्रज्ञानाच्या विस्ताराने जगभरातील देशांना खूप प्रभावित केले असल्याचे ते म्हणाले.

आपल्या पारंपरिक कला या समाजाच्या सक्षमीकरणासह लोकांच्या आर्थिक प्रगतीचे मोठे माध्यम बनल्याचे सांगून पंतप्रधानांनी याबाबत देशभरात सुरू असलेल्या विविध प्रयत्नांची माहिती दिली. २०२५मधील हा 'मन की बात'चा शेवटचा भाग असून २०२६ हे वर्ष विकसित भारत संकल्पाच्या पूर्ततेच्या प्रवासातला एक महत्त्वाचा टप्पा ठरो, अशा शुभेच्छा त्यांनी दिल्या.

#### बदलत्या काळात मुळांशी जोडलेले राहणे महत्त्वाचे

आजचे जीवन अधिकाधिक तंत्रज्ञानावर आधारित होत चालले आहे आणि शतकानुशतके लागणारे बदल आता काही वर्षांतच घडत आहेत. कधीकधी काही लोक अशी चिंता व्यक्त करतात की रोबोट मानवांची जागा घेऊ शकतात. अशा बदलत्या काळात, मानवी विकासासाठी आपल्या मुळांशी जोडलेले राहणे अत्यंत महत्त्वाचे आहे. आपली पुढची पिढी नवीन विचारसरणी आणि नवीन पद्धतींनी संस्कृतीची मुळे धरून आहे हे पाहून मला खूप आनंद होत आहे, असे पंतप्रधान मोदींनी या वेळी सांगितले.

## मंगेश काळोखे हत्येप्रकरणी फरार सर्व आरोपींना अटक

**खोपोली : प्रतिनिधी**



खोपोली नगर परिषदेच्या नवनिर्वाचित नगरसेविका मानसी काळोखे यांचे पती शिवसैनिक मंगेश काळोखे यांच्या हत्या करून पसार झालेल्या सर्व आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेऊन त्यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. खोपोलीतील विहारी पुलाजवळ शुक्रवारी काळोखे यांची धारधार शस्त्रांनी निर्घृण हत्या करण्यात आली होती.

आरोपींमध्ये रवींद्र परशुराम देवकर, दर्शन रवींद्र देवकर, धनेश रवींद्र देवकर, पत्नी उर्मिला रवींद्र देवकर, विशाल सुभाष देशमुख, महेश शिवाजी धायतडक, सागर राजू मोरे, सचिन दयानंद खराडे, व दिलीप हरिभाऊ पवार यांचा समावेश आहे.

मंगेश काळोखे यांची पत्नी मानसी काळोखे यांनी देवकर परिवाराविरोधात नगरपालिकेची निवडणूक लढवली होती. त्यांनी देवकर परिवारातील महिला उमेदवाराचा पराभव केला आणि त्या नगरसेविका झाल्या होत्या. त्यानंतर हे हत्याकांड घडले. सामाजिक व राजकीयदृष्टच्या हा गुन्हा अतिसंवेदनशील स्वरूपाचा होता. त्यामुळे खोपोलीत जनक्षोभ उसळला. गेले दोन दिवस स्थानिकांनी जनआंदोलन केले. आरोपींना तत्काळ अटक करावी अशी मागणी होत होती. पोलीस अधीक्षक आंचल दलाल, अतिरिक्त अधीक्षक अभिजित शिवथरे यांनी आरोपींना अटक करण्याबाबत आश्वासन दिले होते.

दरम्यान, या घटनेचे पडसाद राजकीय वर्तुळात तीव्रतेने उमटले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मंत्री भरत गोगावले आणि स्थानिक आमदार महेंद्र थोरवे यांनी खोपोलीत येऊन काळोखे यांचे नातेवाईक व समर्थकांना शांत करण्याचा प्रयत्न केला व धीर दिला. शिवसेना काळोखे कुटुंबियांच्या मागे खंबीरपणे उभी आहे, असा शब्द नेतेमंडळींनी देऊन आरोपींना अटक करण्यासाठी पोलिसांचे लक्ष वेधले.

आरोपींचा तपास करण्यासाठी खोपोली, खालापूर, रसायनी, नेरळ व स्थानिक गुन्हे अन्वेषण अशी पाच पथके तयार करण्यात आली होती. अखेर फरार झालेल्या सर्व आरोपींना पोलिसांनी गजाआड केले असून अधिक तपास सुरू आहे.

## शेकापला आणखी एक धक्का! वाहतूक सेल जिल्हाध्यक्ष जयेंद्र शेळके समर्थकांसह भाजपमध्ये

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने महाविकास आघाडीसमोर शेकापने शरणागती पत्करली असल्याने शेकापच्या कार्यकर्त्यांमध्ये नाराजीचा सूर पहायला मिळत आहे. त्यामुळे अनेक कार्यकर्ते शेकापला अखेरचा सलाम करत देशविकासाची विचारधारा असलेल्या भाजपमध्ये सहभागी होत आहेत. त्याच अनुषंगाने शेकापच्या वाहतूक सेलचे रायगड जिल्हाध्यक्ष व माजी ग्रामपंचायत सदस्य जयेंद्र बबन शेळके यांनी असंख्य समर्थकांसह रविवारी (दि. २८) भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला. शनिवारीच रोडपाली येथील प्रवेशाच्या धक्क्यातून सावरत नसताना शेकापला आणखी एक मोठा धक्का बसला आहे.

लोकप्रिय व कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल महापालिका निवडणूक प्रमुख आमदार महेश बालदी, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते जयेंद्र शेळके व सहकाऱ्यांचे भाजपची शाल देऊन पक्षात स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमास भाजपचे जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, वासुदेव घरत, पनवेल पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, प्रभाकर जोशी, प्रल्हाद गायकर, सचिन वास्कर आदी पदाधिकारीही उपस्थित होते.

या वेळी शेकापच्या वाहतूक सेलचे रायगड जिल्हाध्यक्ष व माजी ग्रामपंचायत सदस्य जयेंद्र बबन शेळके यांच्यासोबत ओवे, रांजणपाडा, ओवे कॅम्प, सेक्टर २७, ३४, ३५, भागेश्री सोसायटी, रोहींजण येथील अनेक



कार्यकर्त्यांनी समर्थकांसह भाजपमध्ये प्रवेश केला. त्यामध्ये जगदीश शेळके, लहू शेळके, महेंद्र शेळके, अशोक शेळके, कैलास शेळके, भावेश शेळके, कुणाल शेळके, सुभाष शेळके, सुनील शेळके, हर्ष शेळके, समीर वाघमारे, शादाब शेख, तन्वीर शेख, आफताब शेख, सुफियान शेख, कैलास वास्कर, प्रभाकर वास्कर, महेश वास्कर, संतोष घरत, प्रशांत जोशी, शंकूनाथ गडगे, केतन म्हात्रे, पंढरीनाथ भाग्यवंत, चंदू भोपी, राजन चौधरी, खुटाराम चौधरी, प्रेमाराम चौधरी, **(पान २ वर..)**

## निवडक

### मुंबई मनपा निवडणुकीसाठी काँग्रेस-'वंचित'ची आघाडी

**मुंबई :** येथील महापालिका निवडणुकीसाठी ठाकरे बंधूंना बाजूला सारून स्वबळावर लढणाऱ्या काँग्रेस पक्षाने डॉ. प्रकाश आंबेडकर यांच्या वंचित बहुजन आघाडीसोबत रविवारी (दि. २८) आघाडी जाहीर केली. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आणि 'वंचित'चे नेते धैर्यवर्धन पुंडकर यांनी संयुक्त पत्रकार परिषदेत या आघाडीची घोषणा केली. या आघाडी अंतर्गत मुंबईतील एकूण २२७पैकी ६२ जागा वंचित आघाडी लढवणार आहे.

### मुंबईसाठी अजित पवारांच्या राष्ट्रवादीची पहिली यादी जाहीर

**मुंबई :** राज्यात महापालिका निवडणुकांचे पडघम वाजू लागले असून उमेदवारांच्या नावांची यादी निश्चित होत आहे. त्याच पार्श्वभूमीवर मुंबई महापालिका निवडणुकासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार पवारांच्या राष्ट्रवादीने ३७ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली आहे. नबाब मलिक यांचे भाऊ कप्तान मलिक, त्यांची सुन बुशरा मलिक आणि बहीण सईदा खान यांना मनपा मैदानात उतरवण्यात आले आहे.

## जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर यशस्वी व्हा -लोकनेते रामशेठ ठाकूर

### सीकेटी ज्युनिअर कॉलेजचे स्नेहसंमेलन उत्साहात



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विद्यार्थ्यांनो आपल्या भागात विमानतळामुळे नोकरीच्या अनेक संधी आज निर्माण झाल्या आहेत. नवनवीन उद्योग आपल्या भागात येत आहेत. म्हणूनच जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर शिक्षण घेत तुम्ही जीवनात यशस्वी व्हा आणि खूप प्रगती करा, असा मोलाचा सल्ला जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी दिला.

संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विभाग अर्थात ज्युनिअर कॉलेजचे २६वे स्नेहसंमेलन आणि वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा शनिवारी (दि.२७) उत्साहात झाला. त्या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर अध्यक्षस्थानावरून बोलत होते. त्यांनी आपल्या भाषणातून पारितोषिक मिळवणाऱ्या विद्यार्थी व शिक्षकांचे अभिनंदन केले.

या सोहळ्यास प्रमुख पाहुण्या म्हणून रायगड जिल्हा परिषदेच्या उपशिक्षण अधिकारी (माध्यमिक) हेमलता गावित, विशेष अतिथी विमा संचलनालय वांद्रे मुंबईचे सहाय्यक संचालक शिवदास पोटे, संस्थेच्या संचालक मंडळ सदस्य संजय भगत, वर्षा ठाकूर, स्वप्नील ठाकूर, सचिव डॉ. एस.टी. गडदे उपस्थित होते. त्याचप्रमाणे संकुलातील मराठी माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक कैलास सत्रे, उच्च माध्यमिक विभागाचे प्राचार्य प्रशांत मोरे, मराठी प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सुभाष मानकर, इंग्रजी प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका नीलिमा शिंदे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, कैलास म्हात्रे, स्वाती पाटील, वैशाली पारधी यांच्यासह पालक, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने हजर होते.

विशेष अतिथी हेमलता गावित भाषणात म्हणाल्या की, या संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शिक्षण तसेच सामाजिक क्षेत्रात यशस्वी कामगिरी करत आपल्या आई-वडिलांचे स्वप्न साकार केले आहे. **(पान २ वर..)**

## पुण्यात पबवर कारवाई; ५० जण ताब्यात

**पुणे : प्रतिनिधी**

पुण्यातील विमाननगर परिसरात विनापरवाना पहाटे ५ वाजेपर्यंत सुरू असलेल्या द नॉयर (रेड जंगल) या पबवर राज्य उत्पादन शुल्क विभागाने धडक कारवाई केली. पबमधून १७८ विदेशी दारूच्या बाटल्या जप्त करण्यात आल्या असून ५० महिला-पुरुषांना ताब्यात घेतल्याची माहिती एक्साईज विभागाच्या वतीने देण्यात आली.



परवाना नसताना हॉटेल द नॉयर या पबचालक अमरजित सिंग संधू (३०) आणि धर्मेश राज स्वामी (३१, रा. बडोदिया हाऊस, गणेशनगर, वडगाव वेशी) यांनी दारू पिण्यासाठी जागा उपलब्ध करून दिल्याने त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. या ठिकाणी मद्य प्राशन करणारे महिला आणि पुरुष अशा ५० व्यक्तींना ताब्यात घेण्यात आले आहे. या कारवाईदरम्यान एक्साईज विभागाने पबमधील मद्य व्यवसाय चालू ठेवण्यासाठी वापरलेले इतर साहित्य खुर्ची, सोफा, लाकडी टी पॉय, लोखंडी स्पिकर, साऊंड लॅपटॉप, एक कॉम्प्युटर, काचेचे ग्लास, फॉग मशीन आदी साहित्य जप्त केले. एकूण ५२ आरोपींवर कारवाई करण्यात आली आहे. यापैकी दोन आरोपी पबचालक व व्यवस्थापक यांचा शोध सुरू आहे.

## रायगडातील पर्यटनस्थळे गजबजली

### नाताळची सुट्टी व नववर्ष स्वागतासाठी पर्यटकांची गर्दी

**पाली : प्रतिनिधी**

बच्चेकंपनीला पडलेल्या नाताळच्या सुट्ट्यांचा पुरेपूर फायदा घेत पुणे-मुंबईसह महाराष्ट्रातील निरनिराळ्या ठिकाणच्या पर्यटकांची पावले रायगड जिल्ह्यातील पर्यटनस्थळी स्थिरावली आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील समुद्र किनारे, मंदिरे, ऐतिहासिक वास्तू, किल्ले, तीर्थक्षेत्रे गजबजून गेली आहेत.

रायगड जिल्ह्याला विस्तृत समुद्र किनारा लाभला आहे. त्यामध्ये अलिबाग, नागाव, आक्षी, वरसोली, मुरूड, काशीद, श्रीवर्धन, दिवेआगर, हरिहरेश्वर येथील बीच पर्यटकांना भुरळ घालतात. येथील किनाऱ्यांवर बोटींग, घोडागाडी, बाईक राईडची मजा पर्यटक लूटत आहेत. शिवाय मांसाहारी जेवणावर ताव मारत आहेत.

मुरूड आणि अलिबाग समुद्र किनाऱ्यांची मजा लुटतानाच पर्यटक मुरूड जंजिरा आणि कुलाबा किल्ल्याला आवर्जून भेट देत इतिहास जाणून घेत आहेत.



ओहटीच्या वेळी कुलाबा किल्ल्यावर चालत किंवा घोडागाडीने जाता येते, तर भरतीच्या वेळी किल्ल्यावर जाण्यासाठी मोटारबोटची व्यवस्था आहे. जंजिरा किल्ल्यावर जाण्यासाठीही फेरीबोटींची सोय आहे. दक्षिण काशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्रीवर्धन तालुक्यातील हरिहरेश्वरला पर्यटकांसह भाविकांचीही पसंती असते, कारण एकाच ठिकाणी समुद्र किनारा आणि देवदर्शन अशा दोन्ही गोष्टींचा सुरेख संगम साधता येतो, तर उरणजवळील घारापुरी (एलिफंटा) लेणी पाहण्यासाठी कलाप्रेमींची गर्दी होत आहे. तेथे जाण्यासाठीही उरण व गेटवे ऑफ इंडियावरून फेरीबोटीची सेवा उपलब्ध आहे.

थंडीचा जोर वाढत असला तरी माथेरान पर्यटकांनी हाऊसफुल्ल झाले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याची राजधानी असलेल्या रायगड किल्ल्यावर शिवप्रेमी मोठ्या संख्येने येत आहेत.

अष्टविनायकांपैकी दोन गणपती हे रायगडमध्ये आहेत. ते म्हणजे खालापूर तालुक्यातील महडचा वरदविनायक आणि सुधागड तालुक्यातील पालीचा बल्लाळेश्वर. सध्या या ठिकाणी भाविकांची दर्शनासाठी गर्दी होत आहे.

याशिवाय महाडजवळील गांधारपाले लेणी, चवदार तळे, समर्थ रामदास स्वामींनी दासबोध लिहिला ती निसर्गरम्य शिवथरघळ, पोलादपूर येथील तानाजी मालुसरे याचे उमरठ हे गाव व तेथील समाधी, रेवदंडा बीच व किल्ला, सुधागडातील उन्हेरे येथील गरम पाण्याचे कुंड, खालापूर तालुक्यातील उंबरखिंड, अलिबागजवळील खांदेरी उंदेरी किल्ले, काही मंदिरे अशा ऐतिहासिक, नैसर्गिक व धार्मिक स्थळांनादेखील पर्यटक आवर्जून भेट देत आहेत.

## लाडक्या बहिणींनी ई-केवायसी करून घेण्याचे आवाहन

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र सरकारच्या महिला व बालविकास विभागाकडून मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना राबवली जाते. या योजनेतील सर्व पात्र महिला लाभार्थ्यांना दरमहा १५०० रुपये दिले जातात. लाडकी बहीण योजनेचा लाभ पात्र महिलांपर्यंत पोहचावा यासाठी ई-केवायसी प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी सर्व पात्र महिलांनी ३१ डिसेंबरपर्यंत ई-केवायसी करुन घ्यावी, असे आवाहन केले आहे.



मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ अखंडपणे सुरू ठेवण्यासाठी ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी ३१ डिसेंबर ही अंतिम तारीख असून आता केवळ शेवटचे चार दिवस उरले आहेत. सर्व लाडक्या बहिणींनी आजच आपली ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करावी ही नम्र विनंती, असे मंत्री तटकरे यांनी आपल्या एक्स अकाऊंटवरून म्हटले आहे.

## बनावट लायसन्स प्रकरणात मुख्य आरोपी अटकेत

**मुंबई : प्रतिनिधी**

बनावट शिकाऊ वाहनचालक परवाना (लर्निंग ड्रायव्हिंग लायसन्स) देण्यासाठी संकेतस्थळ तयार करून शासकीय संगणक प्रणालीमध्ये अनधिकृत प्रवेश करत नागरिकांची फसवणूक करणाऱ्या टोळीतील मुख्य आरोपीला बिहारमधून अटक करण्यात आली आहे. जालना स्थानिक गुन्हे शाखा आणि सायबर पोलीस ठाण्याने संयुक्तपणे कारवाई केली.

बिड्डुराज प्रमोद यादव (वय २४, रा. टेंगराहा, जि. सहरसा, बिहार) असे या आरोपीचे नाव असून त्याच्याकडून मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. न्यायालयाने त्याला चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

# रायगडातून ११ महिन्यांत ७० अल्पवयीन मुली बेपत्ता

**अलिबाग : रामप्रहर व्रत्त**

रायगड जिल्ह्यात मागील ११ महिन्यात १८ वर्षाखालील ७० अल्पवयीन मुली बेपत्ता झाल्याची गंभीर आणि तितकीच चिंताजनक बाब समोर आली आहे. १ जानेवारी ते ३० नोव्हेंबर या काळातील घटना जिल्ह्यातील २१ पोलीस ठाण्यांच्या हद्दीत घडल्या आहेत. मुली बेपत्ता होण्याच्या घटनांमुळे त्यांच्या सुरक्षेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून पालकांच्या चिंतेत वाढ झाली आहे.

प्रशासनाने पालकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे तर पोलीस यंत्रणेला मुलींच्या सुरक्षिततेसाठी विशेष उपाययोजना करायला सांगितले आहे. मुलींच्या बेपत्ता होण्याची वेगवेगळी

## पालकवर्ग चिंतेत

कारणे समोर आली आहेत. बदलती जीवनशैली अणि वाढते नागरीकरणे यामुळे मुलामुलींच्या मानसिकतेवर होणारा परीणाम यामागचे प्रमुख कारण सांगितले जाते. पालकांनी मोबाईलवरून टोकणे किंवा अभ्यासावरून रागावल्याने मुलं टोकाचे पाऊल उचलून घर सोडतात. अनेकदा मुलींना प्रेमाच्या जाळ्यात ओढून पळवून नेण्याचे प्रकार समोर येत आहेत.

रायगड जिल्ह्याचा विचार केला तर मुली बेपत्ता होण्याचे सर्वाधिक प्रमाण हे खोपोली पोलीस ठाण्याच्या हद्दीतील आहे. खोपोलीतून ११ मुली मागील ११ महिन्यात बेपत्ता झाल्या आहेत. ही आकडेवारी चिंताजनक असून पालकांनी मुलींवर अधिक लक्ष ठेवावे, मुलींना सुरक्षित वातावरण उपलब्ध करून द्यावे, तसेच शाळा, समाजिक संस्थांनी देखील सतर्क राहावे, असे पोलीस प्रशासनाने सांगितले आहे.

पोलिसांनी बेपत्ता मुलींचा शोध घेण्यासाठी तपास मोहीम वाढवली असून, नागरिकांनी कुठल्याही संशयास्पद परिस्थितीची माहिती त्वरित स्थानिक पोलीस ठाण्याला देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

**पोलीस ठाणेनिहाय मुलींची संख्या**

खोपोली ११, खालापूर ४, कर्जत ५, नेरळ ३, रसायनी ७, अलिबाग ५, रेवदंडा ४, मांडवा २, पेण ६, महाड तालुका १, एमआयडीसी २ , रोहा २, कोलाड २, नागोठणे १, माणगाव ६, गोरेगाव १, श्रीवर्धन १, मुरूड १, पाली ४, पोलादपूर १, म्हसळा १, एकूण ७०.

**जिल्ह्यातील बेपत्ता अल्पवयीन मुलींचा शोध पोलीस प्रशासन घेत असून बेपत्ता मुलींपैकी अनेक मुली सापडल्यादेखील आहेत. त्यांना सुरक्षितपणे पालकांच्या स्वाधीन करण्यात आले आहे.**
**-अभिजित शिवथरे**
अप्पर पोलीस अधीक्षक



**अलिबाग : तीन दिवस सुट्टीनंतर परतीच्या प्रवासासाठी पर्यटकांची गर्दी.**
(छाया : जितू शिगवण)

# हेटवणे योजनेच्या बोगद्याचे होणार पहिले ब्रेकथ्रू

## सिडकोचा महत्वाकांक्षी प्रकल्प; पाणीटंचाई होणार कमी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

सिडकोच्या हेटवणे पाणीपुरवठा वृद्धी योजनेच्या कामाला मोठी गती मिळाली असून, पुढच्या आठवड्यात या प्रकल्पातील बोगद्याचे पहिले ब्रेकथ्रू (दोन टोके एकत्र येणे) होणार आहे. सिडकोच्या इतिहासातील हा पहिलाच टनेल ब्रेकथ्रू ठरणार असल्याने या घटनेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.




नवी मुंबई आणि आसपासच्या वेगाने विकसित होणाऱ्या क्षेत्रांमधील पाण्याची वाढती मागणी लक्षात घेऊन सिडकोने ही महत्त्वाकांक्षी योजना हाती घेतली आहे. भूगर्भातील कठीण आव्हाने आणि अभियांत्रिकी अडथळ्यांवर मात करत सिडकोने हा टप्पा गाठला आहे.

पाणीपुरवठा थेट २७० दशलक्ष लिटरवर जाणार या प्रकल्पामध्ये १३.२५ किलोमीटर लांबीचा कच्च्या पाण्याचा बोगदा आणि १५.४ किलोमीटर लांबीचा शुद्ध पाण्याचा बोगदा बांधला जात आहे. सध्या या योजनेतून १२० दशलक्ष लिटर,पाणीपुरवठा होतो, जो हा प्रकल्प पूर्ण झाल्यावर थेट २७० दशलक्ष लिटर पर्यंत पोहोचणार आहे. यामुळे निवासी संकुलांसह व्यावसायिक आणि औद्योगिक क्षेत्राचा पाणीप्रश्न कायमचा सुटण्यास मदत होईल

१०० मीटर खोलीवर आव्हानात्मक काम बोगद्याचा हा ऐतिहासिक ब्रेकथ्रू वहाळ गावाजवळील शाफ्ट-४ येथे होणार आहे. अफकॉन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड या कंपनीमार्फत हे काम सुरू आहे. जमिनीखाली १०० मीटर खोलीवर, सह्याद्रीच्या कठीण पाषाणात हे खोदकाम करण्यात आले आहे. जागेची कमतरता आणि राडारोडा बाहेर काढण्याचे कठीण आव्हान सिडको आणि अफकॉन्सच्या अभियंत्यांनी यशस्वीपणे पेलले आहे.

नॅशनल रेकॉर्डची नोंद या प्रकल्पादरम्यान फ्लेमिंगो या ३.२ मीटर व्यासाच्या टनेल बोअरिंग मशीनचा वापर करण्यात आला. अफकॉन्सने याच प्रकल्पात एका महिन्यात तब्बल ७७७ मीटर बोगदा खोदून नवा राष्ट्रीय विक्रम प्रस्थापित केला आहे. यापूर्वी मे महिन्यात ७१४ मीटर खोदकामाचा विक्रम याच प्रकल्पाच्या नावे होता. पुढील आठवड्यात होणाऱ्या या ब्रेकथ्रूमुळे नवी मुंबईकरांना मोठा दिलासा मिळणार असून, येत्या काळात सिडको क्षेत्रातील पाणीटंचाई इतिहासजमा होण्याची चिन्हे आहेत.

# नवी मुंबईत सहा जणांनी भरले उमेदवारी अर्ज

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई : महापालिका निवडणुकीसाठी २३ डिसेंबरपासून २७ डिसेंबरपर्यंत २४९० अर्जाची विक्री झाली आहे. यात सर्वाधिक अर्ज नेरूळमध्ये ४२५, तर सर्वांत कमी दिघा विभागातून २०७ अर्ज विकले गेले आहेत. शनिवारी ३२५ अर्जाची विक्री झाल्याचे महापालिकेने कळविले आहे.

२३ डिसेंबरपासून शनिवारपर्यंत ६ अर्ज इच्छुक उमेदवारांनी भरले आहेत. कोपरखैरणेमधून आधीचा एक व शनिवारी ३, असे ४, तर नेरूळ २ नामांकन अर्ज दाखल झाले आहेत. अद्याप महायुती आणि महाविकास आघाडीचे जागा वाटप अंतिम न झाल्याने उमेदवारांकडून नामांकन अर्ज भरण्यास वेग आलेला नाही. मात्र, सोमवार व मंगळवारी या शेवटच्या दोन दिवसांत मोठ्या संख्येने अर्ज दाखल होण्याची शक्यता असल्याने प्रशासनाला तारेवरची कसरत करावी लागणार आहे.

# पनवेलच्या सहा प्रभागातून ८५० अर्जांची विक्री; दाखल एकही नाही

**कळंबोली : बातमीदार**

पनवेल महापालिकेच्या निवडणुकीसाठी पनवेल महा पालिकेचे प्रशासन सज्ज झाले असून उमेदवारांना उमेदवारी अर्ज घेण्यासाठी पनवेल महापालिकेच्या सहा प्रभागात विविध ठिकाणी कार्यालय सज्ज झाली आहेत.या सहा प्रभाग समिती मधून अद्याप पर्यंत ८५० उमेदवारी अर्जांची विक्री झाली आहे, मात्र रविवार पर्यंत एकही उमेदवारी अर्ज दाखल झाला नसल्याचे महापालिकेच्या वतीने दिलेल्या आकडेवारीवरून दिसून येत आहे.

महाविकास आघाडी आणि महायुतीमध्ये उमेदवारी अद्याप निश्चित झाली नसल्याने सावधगिरीचा उपाय म्हणून उमेदवारांची नावे ही जाहीर करण्यात आलेली नाहीत.

अद्यापपर्यंत या सहा प्रभाग समिती मधून ८५० उमेदवारी अर्ज विक्री झाल्याचे एकूण आकडेवारीवरून दिसून येत आहे. यामध्ये प्रभाग समिती अ उपविभाग नावडे १६४, प्रभाग समिती ड खारघर १२५, प्रभाग समिती ब कळंबोली १५७,प्रभाग समिती क कामोठे १४३,प्रभाग समिती ड पनवेल १ १३२, प्रभाग समिती पनवेल ड २ १२९ अर्जांचा समावेश आहे. जरी ७८ जागांसाठी अद्याप पर्यंत ८५० अर्जांची विक्री झाली असली तरी एकही उमेदवार अर्ज एकाही प्रभाग समितीमध्ये दाखल झाला नसल्याचे सांगण्यात आले आहे.

महाविकास आघाडी आणि महायुती यांचे अद्यापपर्यंत जागावाटपाचे समीकरण पूर्ण न झाल्याने उमेदवारांची नावही गुलदस्त्यातच ठेवण्यात आलेली आहेत. बंडखोरीचा फटका कोणालाच बसू नये याची पुरेपूर काळजी सर्वच पक्ष घेत आहेत. एकंदरीत निवडून जाणाऱ्या नगरसेवकांची संख्या कमी मात्र इच्छुक उमेदवारांची संख्या शेकड्याने असल्याचे उमेदवारी अर्ज झालेल्या विक्रीवरून दिसून येत आहे. त्यामुळे पनवेल महापालिकेच्या निवडणुकीमध्ये चित्र आतापर्यंत स्पष्ट झालेले नाही.

१ जुलै २०२५च्या मत नोंदणी आकडेवारीनुसार पाच लाख ५४ हजार ५७८ एकूण मतदार आपला मतदानाचा हक्क बजावणार आहेत. यामध्ये पुरुष मतदार संख्या दोन लाख ९४ हजार ८२१ तर स्त्री मतदार संख्या दोन लाख ५९ हजार ६८५ व तृतीयपंथी ७२ मतदारांचा समावेश आहे. या मतदान प्रक्रियेसाठी व निवडणूक प्रक्रिया पूर्ण पार पाडण्यासाठी एकूण ४५०० कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात येणार आहे.

यामध्ये भरारी पथकामध्ये ६ कर्मचारी, स्थिर सर्वेक्षणासाठी ६ कर्मचारी व व्हिडिओ चित्र करण्यासाठी २ कर्मचाऱ्यांची नियुक्ती ही करण्यात आली आहे. निवडणूक प्रक्रिया अत्यंत नियमानुसार काटेकोर व पारदर्शक पद्धतीने व्हावी याकरता प्रशासनाने कंबर कसली आहे. पनवेल महापालिकेचे आयुक्त डॉ.मंगेश चितळे यांनी आपली निवडणूक यंत्रणा आणि प्रशासन पुरेपूर सज्ज ठेवले आहे.

# एन.डी. स्टुडिओला चित्रीकरणासाठी लाभतोय प्रतिसाद

## चित्रीकरण स्थळांची डागडुजी



**कर्जत : रामप्रहर वृत्त**

जागतिक कीर्तीचे दिवंगत कला दिग्दर्शक नितीन चंद्रकांत देसाई यांनी उभारलेल्या एन. डी. स्टुडिओला गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी राज्य शासनाने नानाविध उपक्रम हाती घेतले आहे. गेल्या वर्षापासून या स्टुडिओमध्ये चित्रपटांच्या चित्रीकरणास प्रारंभ झाला आहे. या स्टुडिओचा उपयोग केवळ चित्रीकरणासाठीच नाहीतर त्याचा पर्यटनस्थळ म्हणून विकास व्हावा, यासाठी राज्य शासनाच्या वतीने मास्टर प्लॅन तयार करण्यात येत आहे. सध्या स्टुडिओत असलेल्या चित्रीकरण स्थळांची डागडुजी सुरू आहे.

रायगड जिल्ह्यातील खालापूर तालुक्यातील कर्जत रस्त्यावरील चौक फाटा येथे असलेला एन. डी. स्टुडिओ नितीन देसाई यांनी सुमारे ४६ एकरवर उभारणी केली आहे. या स्टुडिओत जोधा अकबर, बाजीराव मस्तानी, प्रेम रतन धन पायो अशा अनेक चित्रपटांचे चित्रीकरण सेट्सची उभारणी देसाई यांनी केली होती. याशिवाय शिश महल, खेडे गाव, परदेशी स्थळे, चित्रपट संग्रहालय यांचा समावेश आहे.

याशिवाय येथे १०० निवासी खोल्या आणि छोटेखानी बंगले आहेत. देसाई यांच्या निधनानंतर गेल्या वर्षी नोव्हेंबर २०२४ मध्ये राज्य शासनाने एन. डी. स्टुडिओ ताब्यात घेतला. या स्टुडिओची जबाबदारी राज्य शासनाने महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाकडे सोपवली आहे.

पान १ वरुन



## शेकापला आणखी एक धक्का! वाहतूक सेल जिल्हाध्यक्ष जयेंद्र शेळके समर्थकांसह भाजपमध्ये

बगदराम चौधरी, प्रकाश चौधरी, उमेशराम चौधरी, नेनाराम चौधरी, योगेश भीमराव जाधव, रोहित चव्हाण, दीपक भातोसे, सुशांत साळुंखे, गणेश जाधव, धनंजय साळुंखे, शिवराम जाधव, निलेश जाधव, मुकेश चौधरी, वरूण कांबळे, गौतम कांबळे, लखनभाई, छोटूभाई, कमलाकर पाटील, कुंदन घरत, सिद्धार्थ केणी, जतिन केणी, पियुष खुटारकर, कुणाल खुटारकर व समर्थकांनी 'कमळ' हाती घेतले.

शेकाप ध्येय-धोरणे विसरून इतर पक्षांच्या कुबड्या घेऊन चालत आहे. एकेकाळी शानमध्ये असलेल्या शेकापला लागलेली घरघर आता वाढली आहे. त्यामुळे शेकापने महाविकास आघाडीसमोर एक प्रकारे नांगी टाकली असल्याने शेकाप कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम व नाराजीचा सूर उमटत आहे. शेकापची अवस्था बिकट झाली असून इतर पक्षांच्या छायेत जगण्याची सवय झाली आहे आणि हीच गोष्ट कार्यकर्त्यांच्या संतापाचे कारण ठरत आहे.

## जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर यशस्वी व्हा -लोकनेते रामशेठ ठाकूर

ते आधुनिक युगातील दानशूर कर्ण, दानशूर माऊली आहेत. त्यांचा आदर्श आपण सर्वांनी घेतला पाहिजे. जीवनात कोणतेही अपयश आले तरी न डगमगता खंबीरपणे सामना करून त्याचे यशात रूपांतर करता आले पाहिजे, असेही त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले.

प्रमुख पाहुणे शिवदास पोटे यांनी म्हटले की, सीकेटी कॉलेज हे सर्वात शिस्तबद्ध आणि स्वच्छ असे कॉलेज आहे. विद्यार्थ्यांनो जीवनात तुम्ही शिक्षण आणि आरोग्य या दोन्ही गोष्टी कमवायला शिकले पाहिजे. शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे ते केवळ वाचून चालणार नाही, तर ते तुम्हाला प्यावेच लागेल. जीवनात आई-वडिलांना आणि शिक्षकांना कधीच विसरू नका.

प्रास्ताविकात उच्च माध्यमिक विभागाचे प्राचार्य प्रशांत मोरे यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली तसेच उच्च माध्यमिक विभागाच्या सतत उंचावणारा एचएससी बोर्ड निकाल, राबवले जाणारे विविध उपक्रम, क्रीडा क्षेत्राची इनडोअर आणि आउटडोअर कामगिरी, एनएसएस युनिट अशा सर्व बाबींचा उल्लेख प्राचार्यांनी केला.

उच्च माध्यमिक विद्यालयाच्या वार्षिक अहवालाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले तसेच शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये परीक्षा विभाग, मेकरथॉन, आदर्श विद्यार्थी, विद्यार्थी विशेष पुरस्कार, विशेष कामगिरी शिक्षक पुरस्कार, एनएसएस स्वयंसेवक पुरस्कार तसेच शालेय वार्षिक क्रीडा स्पर्धा, विभागीय,राज्य या विविध स्तरावर क्रीडा स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी केलेल्या क्रीडापटूंचा, शिक्षकांचा मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरव करण्यात आला. प्राचार्य प्रशांत मोरे यांना पिल्लई युनिव्हर्सिटी नवीन पनवेलतर्फे प्रतिष्ठित कॅडमीक लीडरशिप एक्सलन्स अवॉर्ड २०२५ मिळाल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

यानंतर 'योद्धा' या विशेष अशा सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून इयत्ता अकरावी कला, वाणिज्य व विज्ञान विभागाच्या विद्यार्थ्यांनी सुंदर असे नृत्याविष्कार सादर केले. आपल्या नृत्याविष्कारातून विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, नरवीर तानाजी मालुसरे, महाराणा प्रताप, पृथ्वीराज चौहान, राजमाता जिजाऊ, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर, झाशीची राणी, ताराबाई, हंबीरराव मोहिते, हिरकणी यासारख्या योद्ध्यांनी केलेल्या पराक्रमाचे नृत्य स्वरूपात सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. सहाय्यक शिक्षिका अपर्णा मुकणे आणि योगिता जोरी यांनी कार्यक्रमाचे निवेदन केले. वंदे मातरम आणि आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.



# पोपटी खवय्यांना गावठी वालाची प्रतीक्षा

**रायगड : रामप्रहर वृत्त**

अवकाळी पावसाने प्रथमतः खरीप हंगामातील भातशेतीतून तोंडाशी आलेला घास शेतकऱ्याकडून हिरावून घेतला. त्यानंतर रब्बी हंगामात भाजीपाला लागवड आणि कडधान्याची नासाडी केली आहे. त्यातच आता ऐन गुलाबी थंडीत वातावरणीय बदलाचा फटका तूर, वालाच्या शेंगा उत्पादक शेतकऱ्यानाही बसल्याचे चित्र रायगड जिल्ह्यातून समोर येत आहे. कारण आतापर्यंत वालाच्या शेंगाचे उत्पादनच झालेले नाही. त्यामुळे शेंगा प्रेमींना ग्रामीण भागातील गावठी शेंगांसाठी वाट पहावी लागणार आहे.

यापुर्वी वालाच्या शेंगांची आवक मार्गशिष महिन्यापासून चांगल्या प्रमाणात होत होती. मात्र मागील एक दोन वर्षांपासून अवकाळी पाऊस अधून मधून हजेरी लावत असल्याने वालाच्या शेंगांचे उत्पादन लांबणीवर जात असल्याचे पाहायला मिळत आहे.दरम्यान सद्यस्थितीत रायगड मधील भाजीपाला बाजारातील उपलब्ध असलेल्या वालाच्या शेंगा ह्या अधिकतम बाहेरील जिल्ह्यातून येत असल्याचे विक्रेत्यांनी सांगितले. त्यामुळे ऐन थंडीत शेंगा प्रेमीच्या जिभेला हव्या असणाऱ्या ग्रामीणमधील गावठी शेंगांच्या पोपटीच्या माध्यमातून चवीचा आस्वाद घेता घेत नसून गावठी शेंगांची पारख असलेले ग्राहकांची हिरमोड होत असून असे ग्राहक त्याशेंगाकडे दुर्लक्ष करुन गावठी शेंगांच्या प्रतिक्षेत असल्याचे दिसून येत आहे.

भात कापणीनंतर लागवड केलेल्या वालाच्या शेंगांचे उत्पादन जानेवारी, फेब्रुवारीपर्यंत मोठ्या प्रमाणात होत होते. आता भातशेतीतील लावणी आणि कापणीचा कालावधी लांबल्याने कडधान्ये, वालाच्या शेंगांची लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांचेही



गणित कोलमडले असून शेंगांच्या उत्पादनाची प्रतीक्षा करावी लागत असाल्याने शेतकयांना नुकसान सहन करावा लागत आहे.अलीकडील बदलत्या हवामान स्थितीचा पिकांवर परिणाम होत असून महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यात चालू हंगामात पावसाचा कालावधी अपेक्षेपेक्षा मोठ्या प्रमाणात लांबल्यामुळे जमिनीत जास्त काळ ओलावा टिकून राहिल.

कोकणातील रायगड जिल्हा म्हणजे चविष्ट, पारंपरिक आणि मातीच्या सुगंधाने भरलेली पाककृतींची परंपरा. याच परंपरेतील एक खास, लोकप्रिय आणि सगळ्यांच्या जिभेवर रेंगाळणारी डिश म्हणजे पोपटी. हा पदार्थ कोकणी संस्कृतीचा महत्त्वाचा भाग बनला आहे. परंपरेने ही डिश मातीच्या भांड्यात, शेणाच्या गोवऱ्यांच्या आणि लाकडाच्या आगीवर शिजवली जाते. फणसाच्या पानांनी झाकून, त्यावर भाज्या, वाटप, मांस किंवा चिकन टाकून वाफेवर शिजवलेली पोपटी अस्सल चव देऊन जाते.

## निवडक

### पनवेल परिसरातून एक जण बेपत्ता



**पनवेल :** परिसरात राहणारे राहणारा एक इसम कोणास काही एक ना सांगता घरातून बाहेर गेला असून तो अद्याप घरी न परतल्याने तो हरवल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. संजय आत्माराम यादव (वय ४९) असे या इसमाचे नाव असून त्याची उंची अंदाजे ५.१ फुट, रंग गोरा, केस काळे, डोळे काळे, नाक सरळ, चेहरा उभट, बांधा सडपातळ, अंगात लाल टिशर्ट व तपकिरी पॅन्ट असून त्याला भाषा मराठी व हिंदी अवगत आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे किंवा पोलीस नाईक तानाजी खैरावकर यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### कळंबोली वसाहतीतून महिला बेपत्ता



**पनवेल :** कळंबोली वसाहतीमध्ये राहणारी एक महिला बँकेच्या कामासाठी सिवुड्स येथे जाते असे सांगून घराबाहेर पडली असून ती अद्याप घरी न परतल्याने ती हरवल्याची तक्रार कळंबोली पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. रश्मी भागेश जाधव (वय २९ वर्ष) असे या महिलेचे नाव असून तिची उंची पाच फुट दोन इंच, रंग चेहरा-गोल, नाक सरळ, डोळेबारीक, डोक्याचे केर साधारण वाढलेले, बांधा जाड, अंगावर नेसुस कपडे माहीं भाषा मराठी, हिंदी बोलता येते. या महिलेबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी कळंबोली पोलीस ठाणे किंवा पोलीस हवा एस. व्ही. मासुळ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### तबला वादनात रूचिता खुटलेचे सुयश



**पनवेल :** मुंबई येथे आयोजित केलेल्या आंतरशालेय सोलो तबला वादन स्पर्धेत पनवेल तालुक्यातील नेरेपाडा येथील रूचिता नरेश खुटले हिने प्रथम क्रमांक पटकावला. रुचिता नरेश खुटले ही दहावी इयत्तेत असून रामकृष्ण अकॅडमी हरिग्राम, केवाळे येथे शिक्षण घेत आहे. तिचे गुरु मधुकर धोंगडे आहेत. सोलो तबलावादन स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावल्या बद्दल तिचे विविध स्तरातून अभिनंदन केले जात आहे.

# पनवेलमध्ये रुग्णोपयोगी साहित्य केंद्राचा शुभारंभ

## सेवाभारती कोकण प्रांत ट्रस्टच्या माध्यमातून उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल शहरात गरजू रुग्णांसाठी अत्यल्प दरात रुग्णोपयोगी साहित्य भाडेतत्त्वावर उपलब्ध करून देणारे केंद्र सुरू झाले आहे. सेवाभारती कोकण प्रांत ट्रस्ट यांच्या माध्यमातून पनवेल येथील डॉ. प्रभाकर पटवर्धन स्मृती रुग्णालयात हे केंद्र कार्यान्वित करण्यात आले आहे.



या उपक्रमासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या महर्षी वाल्मिकी शाखा व नंदनवन शाखेतील सेवाभावी स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले. सेवाभारती संस्थेकडून काही प्राथमिक साहित्य उपलब्ध करून देण्यात आले असून, उर्वरित व्यवस्था स्वयंसेवकांनी स्वेच्छेने दिलेल्या देणग्यांतून उभारण्यात आली आहे.या केंद्रासाठी आवश्यक जागा व प्राथमिक सहकार्य डॉ. प्रभाकर पटवर्धन स्मृती रुग्णालयाकडून देण्यात आले आहे. साहित्य वाटप, नोंदवही ठेवणे तसेच रुग्ण व त्यांच्या नातेवाइकांशी प्रेमळ संवाद साधण्याची जबाबदारी शाखेतील स्वयंसेवक पार पाडणार आहेत. हे केंद्र आठवड्याचे सातही दिवस सायंकाळी ५ ते ७ या वेळेत सुरू राहणार आहे.

या केंद्रामार्फत फाउलर बेड, एअर बेड, वॉटर बेड, ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर, व्हील चेअर, वॉकर, कमोड चेअर, नेब्युलायझर, वॉकिंग स्टिक, विविध प्रकारचे पॉट व काही वैद्यकीय बेल्ट यांसारखे साहित्य अत्यल्प भाडे व डिपॉझिटवर उपलब्ध करून दिले जाणार आहे. भविष्यात या साहित्यात आणखी भर घालण्याचा मानस आहे. या केंद्राचे औपचारिक उद्घाटन प्रथितयश डॉक्टर डॉ. ययाती गांधी यांच्या हस्ते झाले.

या वेळी कोकण प्रांत संघटक सुरेंद्र शर्मा, डायबेटोलॉजिस्ट डॉ. कीर्ती समुद्र, पनवेल नगर संघचालक राकेश फाटक तसेच सेवाभारती कोकण प्रांताचे अविनाश धाट उपस्थित होते. आपण देत असलेली सेवा व्यावसायिक नसून समाजाशी नाते जोडणारी असली पाहिजे. ही सेवा तळागाळातील गरजूंपर्यंत पोहोचली पाहिजे आणि संघाच्या निस्वार्थ सेवेचा आदर्श समाजासमोर ठेवला पाहिजे, असे मनोगत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.या केंद्राचे प्रमुख म्हणून अमोल शेटे तर सहकारी म्हणून प्रकाश चांदवडकर व भुस्कुटे हे काम पाहणार आहेत.

केंद्र सुरू करण्यासाठी संघाचे कार्यकर्ते तसेच पटवर्धन रुग्णालयातील श्री. लघाटे, प्रसन्ना खेडकर आदींनी विशेष परिश्रम घेतले. याच कार्यक्रमात सुरेंद्र शर्मा यांनी सेवाभारतीच्या विविध सेवाकार्यांची माहिती दिली.

## वाईन शॉपमध्ये भीषण राडा

### खारघरमधील घटना; मद्यधुंद तरुणाने धिंगाणा घालून केली तोडफोड

**पनवेल : वार्ताहर**

खारघरमधील गोल्ड कॉईन वाईन मार्टमध्ये मद्यधुंद तरुणाने धिंगाणा घालत भीषण राडा केल्याची घटना घडली. दारूच्या नशेत असलेल्या तरुणाने रात्रीच्या सुमारास वाईनशॉपमध्ये घुसून लाकडी बांबूने नामफलक व इतर साहित्याची तोडफोड केली. अचानक झालेल्या या प्रकारामुळे परिसरात एकच गोंधळ उडाला.



घटनेच्या वेळी तरुणाने दुकानासमोर मोठा गदारोळ केला. परिस्थिती नियंत्रणाबाहेर जात असल्याचे पाहून स्थानिक नागरिकांनी हस्तक्षेप करत संबंधित तरुणाला चोप देत ताब्यात घेतले. त्यानंतर खारघर पोलिसांना घटनेची माहिती देण्यात आली. खारघर पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत मद्यधुंद तरुणाला ताब्यात घेतले.

या प्रकरणी त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील चौकशी सुरू आहे. या घटनेमुळे परिसरातील व्यापारी व नागरिकांमध्ये संताप व्यक्त करण्यात येत आहे. पोलिसांनी अशा प्रकारच्या गैरप्रकारांवर कठोर कारवाईची मागणी स्थानिकांनी केली आहे.

## पनवेलमध्ये पिस्टलसह सहा जिवंत काडतूसे जप्त; एक जण ताब्यात

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पनवेल शहर पोलिसांनी शहरातून एक पिस्टल सह सहा जिवंत काडतुसे जप्त करून एकाला अटक केली आहे.



महानगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने पोलिसांनी शहरात गस्त वाढवली असतानाच, पनवेल शहर पोलीस ठाणे हद्दीत गोपनीय बातमीदाराच्या बातमीच्या आधारे पनवेल रेल्वे स्टेशन परिसरात साफळा लावून एक व्यक्तीस पिस्टल व ६ जिवंत काडतुसाह मिळून आल्याने त्यास ताब्यात घेतले. अनंथ अधिमुलम पाडायची (वय ३६, रा.सानपाडा) असे या इसमाचे नाव असून त्याच्यावर पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. निवडणुकीच्या काळात अशा प्रकारे शस्त्रसाठा सापडल्याने शहरात एकच खळबळ उडाली असून पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

ही कामगिरी वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक निरीक्षक सचिन पोवार, सुनील वाघ, उपनिरीक्षक किरण राउत, हवालदार प्रवीण पवार, नाईक भोसले, शिपाई काकडे, कराड आणि लोखंडे यांच्या पथकाने केली.

## 'स्वीप' अंतर्गत शाळांमध्ये मतदार जनजागृती कार्यक्रम




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या स्वीप उपक्रमांतर्गत मतदान जनजागृतीसाठी सी.के.टी. स्कूल, नवीन पनवेल, दि. बा. पाटील शाळा महानगरपालिका शाळा क्र. १, के.एल.ई. महाविद्यालय, कळंबोली, महानगरपालिका शाळा क्र. ५ मोठा खांदा येथे नुकतेच विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

महापालिकेच्या क्षेत्रातील विविध शाळा व महाविद्यालयांमध्ये चित्रकला, निबंध लेखन, पत्र लेखन, वक्तृत्व, रांगोळी आणि पोस्टर मेकिंग या प्रकारच्या स्पर्धा घेण्यात आल्या.

येत्या १५ जानेवारीला महापालिकेची सार्वत्रिक निवडणूक होत आहे. या अनुषंगाने विद्यार्थ्यांमध्ये लोकशाही मूल्ये रुजावित, जबाबदार मतदाराचे व मतदानाचे महत्व लक्षात यावे, मतदानाबाबत जागरूकता वाढवावी या उद्देशाने मतदान जनजागृतीसाठीच्या स्वीप कार्यक्रमांतर्गत विविध शाळा व महाविद्यालयांमध्ये महापालिकेच्या वतीने विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात येत आहे.

## भाजप पदाधिकाऱ्यांनी अनुभवली 'मन की बात'

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्षाच्या पनवेल शहर व मध्यवर्ती कार्यालयात रविवारी (दि.२८) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मन की बात या कार्यक्रमाच्या १२९व्या भागाचे थेट प्रक्षेपण उत्साहात झाले.



या वर्षातील हे शेवटचे संबोधन असल्याने या कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले होते. या वेळी भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, भाजप राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, नवीन पनवेल मंडळ अध्यक्ष दशरथ म्हात्रे, पनवेल पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील आणि माजी नगरसेवक प्रभाकर बहिरा, दिनेश खानावकर, अंकुश पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळच्या संबोधनात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ऑपरेशन सिंदूरचा गौरवपूर्ण उल्लेख करत भारतीय सैन्याच्या शौर्याचे कौतुक केले. तसेच अवकाश क्षेत्रातील प्रगती, क्रीडा क्षेत्रातील भारताची चमकदार कामगिरी आणि विशेषतः महिला क्रिकेट संघाने विश्वचषक जिंकून दाखवलेली नारी शक्ती यावर त्यांनी प्रकाश टाकला.

काश्मीरमधील पुनरुज्जीवित झालेले वैभव आणि तिथल्या सकारात्मक बदलांचा उल्लेख करत त्यांनी संपूर्ण देशाला आगामी नवीन वर्षाच्या शुभेच्छा दिल्या.

## प्रसाद खापणे यांची नियुक्ती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन पनवेल शहर मंडळ अध्यक्ष दशरथ म्हात्रे यांनी भाजप नवीन पनवेल शहर मंडळ क्रीडा प्रकोष्ठ सेल अध्यक्षपदी प्रसाद खापणे यांची नियुक्ती केली आहे.

खापणे यांना दिलेल्या नियुक्तीपत्रात, पक्ष संघटना अधिकाधिक मजबुत करण्याकरिता आपणाकडे ही जबाबदारी सोपविण्यात येत आहे. आगामी काळात आपण सर्वांना सोबत घेवुन पक्ष संघटन अधिक मजबूत करून विविध निवडणुकांमध्ये पक्षाला मोठे यश मिळवुन द्याल. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर तसेच उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी तसेच सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली आपण भाजपचे ध्येय, धोरण व कार्यक्रमांची यशस्वीरित्या अंमलबजावणी कराल, असे नमुद करण्यात आले आहे.



खापणे यांना नियुक्तीपत्र देतेवेळी नवीन पनवेल शहर मंडळ अध्यक्ष दशरथ म्हात्रे, माजी नगरसेवक एकनाथ गायकवाड, माजी नगरसेविका सीताताई पाटील, गणेश पाटील, भीमराव पवार, अभिषेक भोपी, संजय कांबळे, मोतीराम कोळी, मस्ती ग्रुपचे अध्यक्ष बबन म्हात्रे, सचिन नाईक, सुधाकर बनसोडे आदी उपस्थित होते.

दरम्यान, या नियुक्तीबद्दल खापणे यांचे विविध स्तरांतून अभिनंदन होत आहे.



**पनवेल : गव्हाण ग्रामपंचायतीच्या सदस्य ॲड. योगिता सुहास भगत यांच्याकडून शेलघर गावातील गरजू महिला मंजुळा कडू यांना गॅस शेगडी व सिलिंडर वाटप करण्यात आले. या वेळी शेलघर गावचे अध्यक्ष अमृत भगत, युवा कार्यकर्ते सुहास भगत, संतोष भगत, ज्ञानेश्वर म्हात्रे, रंजीत भगत, महेश भगत आदी उपस्थित होते.**

## रामशेठ ठाकूर विद्यालयातील विद्यार्थ्यांची बिग कोला कंपनीत भेट

**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघरमधील रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाच्या बारावी वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी २६ डिसेंबर २०२५ रोजी बिग कोला कंपनी, पाताळगंगा येथे शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले होते. या सहलीचे मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना उद्योग विश्वाची प्रत्यक्ष माहिती देणे तसेच उत्पादन, व्यवस्थापन आणि वितरण या प्रक्रिया समजावून सांगणे हा होता.



या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना बिग कोला कंपनीतील पेय निर्मिती प्रक्रिया, कच्चा माल निवड, गुणवत्ता नियंत्रण, पॅकेजींग तसेच आधुनिक यंत्रसामुग्रीचा वापर याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. कंपनीतील तत्र अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत उत्पादन खर्च, ब्रँडींग, जाहीरात धोरणे आणि बाजारातील स्पर्धा या विषयी मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांनी उद्योगातील प्रत्यक्ष कामकाज पाहून वाणिज्य विषयातील संकल्पना अधिक स्पष्टपणे समजून घेतल्या. व्यवस्थपन कौशल्य, वेळेचे महत्व आणि शिस्त यांचे महत्वही विद्यार्थ्यांना या भेटीतून अनुभवता आले. ही शैक्षणिक भेट विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त ठरेल. या भेटीचे आयोजन केल्या बद्दल सर्व विद्यार्थ्यांनी प्राचार्या निशा नायर यांचे आभार मानले.

## चिरनेर प्राथमिक शाळा प्रांगणात फळझाडांची लागवड

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

चिरनेर येथिल प्राथमिक शाळेच्या प्रांगणात निसर्गप्रेमी तथा निवृत्त जिल्हा नियोजन अधिकारी श्रीधर मोकल यांच्या संकल्पनेतून व स्वखर्चातून विविध प्रकारच्या फळझाडांची लागवड २६ ते २८ डिसेंबर या कालावधी दरम्यान करण्यात आली.



या फळ झाडांमध्ये चिकू, फणस, पल बोर, करमत, स्ट्रॉबेरी, पांढरी जांभूळ, सूपर पेरू, अवाकॅडो, मलबारी नारळ, सफरचंद, चिंच, संत्र, लिंबू, सिताफळ, हनुमान फळ, रुमानिया एटीएम आंबा, मलबेरी, थाई एटीएम आंबा, एग्ज फ्रुट, हनुमान फळ, आवळा, अंजीर, रोज पल, अननस यासारख्या ५० प्रकारच्या फळझाडांची व मोरपंखी, कागदी सारखी फुल झाडांची तसेच शोभेच्या झाडांची लागवड करण्यात आली आहे. या झाडांच्या लागवडीबरोबर संवर्धनाची जबाबदारी श्रीधर मोकल यांनी घेतली आहे. तर उपक्रमाला उरण वनपरिक्षेत्राकडून विशेष मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

फळझाडांच्या लागवडी प्राथमिक शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सचिन म्हात्रे, माजी अध्यक्ष प्रविण म्हात्रे, महिला व बाल विकास अधिकारी साधना मोकल, मुख्याध्यापक बळीराम पाटील, चिरनेर ग्रा. पं. सदस्य समाधान ठाकूर, भारती ठाकूर, समिर डुंगीकर, संदिप चिर्लेकर, मनोज नारंगीकर, हिंमत केणी, पुनम गोंधळी, सुनिता पिचड, विणा साळुंके, कृष्णा व्यापारी, अशोक कांबळे, रामचंद्र म्हात्रे, निलेश ठाकूर, जयेश खारपाटील, निर्भय म्हात्रे, महेश सुतार, शिवप्रसाद पंडीत, रोशन थळी, गिता नवाळे, पुष्पलता म्हात्रे, पल्लवी विश्वे, गोवर्धन पाटील, किशोर पाटील, चांद शेख, संगम म्हात्रे, रंजना म्हात्रे, सुधाकर कातकरी यांच्यासह अन्य ग्रामस्थ व शाळेचे शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

## शिक्षिका जयश्री सागरेंना सेवानिवृत्तीपर निरोप

**कळंबोली : बातमीदार**

सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या नवीन पनवेल येथील श्री संत साईबाबा प्राथमिक विद्यालयातील सहाय्यक शिक्षिका जयश्री सुरेश सागरे हया आपल्या ३६ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त होणार आहेत. त्यांचा सेवापूर्ती सोहळा विद्यालयाच्या वतीने शनिवारी विद्यालयात आयोजित करण्यात आला होता.



कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मुख्याध्यापिका वैशाली पाटील यांनी भूषविले. या वेळी के. आ. बाठीया विद्यालयाचे प्राचार्य भगवान माळी, माजी मुख्याध्यापिका हेमलता पाटील, माजी मुख्याध्यापिका स्मिता पाटील, सुषमा गोखले तसेच भाऊ-बहीण नातेवाईक मित्र परिवार वर्गशिक्षक, वर्गमित्र मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमानिमित्त अनेक मित्र वर्ग, सहकारी शिक्षकांनी आपले मनोगत व्यक्त करून जयश्री सागरे यांचे जीवनातील चढ उताराचा आलेख मांडला.

सागरे यांनी सांगितले की, माझ्या सर्व सहकारी मित्र वर्गाचे माझ्याविषयी असलेले प्रेम कधीच विसरू शकणार नाही. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रतिभा मंडले यांनी केले.

## संपादकीय

# प्रगतीचा संकल्प

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी १२९व्या मन की बात कार्यक्रमामधून जनतेशी संवाद साधला. या निमित्ताने त्यांनी भारताशी संबंधित वर्षभरातील महत्त्वाच्या घटनांचा आढावा घेतला. वर्ष २०२५ची संपूर्ण उपलब्धी, देशाची दिशा, युवा आणि भावी काळाबद्दल विचार पंतप्रधानांनी मांडले आणि वर्ष २०२६साठी प्रेरणादायी संदेश दिला. या संवादाने पुन्हा एकदा देशातील विविध घटकांचे मनोबल उंचावले, ज्यामुळे नागरिकांना राष्ट्राच्या प्रगतीत सहभागी होत पुढे जाण्याची प्रेरणा मिळेल.

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज त्यांच्या लोकप्रिय रेडिओ कार्यक्रम 'मन की बात'मधून देशवासीयांशी साधलेला संवाद हे केवळ भाषण नव्हते, तर तो देशाच्या आत्मविश्वासाचा, प्रगतीचा आणि भविष्यासाठीच्या संकल्पांचा आरसा होता. वर्ष २०२५च्या अखेरीस सादर झालेला हा कार्यक्रम संपूर्ण देशाला आत्मपरीक्षण, प्रेरणा आणि नव्या वर्षासाठी दिशादर्शक ठरला. पंतप्रधान मोदींनी २०२५मधील देशाच्या महत्त्वपूर्ण कामगिरीचा आढावा घेतला. राष्ट्रीय सुरक्षा, विज्ञान-तंत्रज्ञान, क्रीडा, पर्यावरण संरक्षण, सांस्कृतिक जतन अशा विविध क्षेत्रांत भारताने मिळवलेली प्रगती त्यांनी मांडली. विशेषतः राष्ट्रीय सुरक्षेतील यश, वन्यजीव संरक्षणातील प्रगती, क्रीडा क्षेत्रातील भारताची जागतिक कामगिरी हे मुद्दे देशवासीयांसाठी अभिमानास्पद ठरले. या संवादाचा केंद्रबिंदू होता युवा भारत. देशाची खरी ताकद ही तरुणाईमध्ये आहे, हा विश्वास पंतप्रधान मोदींनी ठामपणे मांडला. नवप्रवर्तन, स्टार्टअप्स, तंत्रज्ञान, संशोधन आणि सामाजिक उपक्रमांमध्ये युवकांनी घेतलेली पुढाकाराची भूमिका ही भारताच्या भविष्यासाठी आश्वासक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. पंतप्रधानांनी भारतीय परंपरा, कला, लोकसंस्कृती आणि आधुनिक विकास यांचा समतोल साधण्याचे महत्त्व अधोरेखित केले. आर्थिक प्रगती ही केवळ उद्योगांपुरती मर्यादित नसून संस्कृती आणि मूल्यांवर आधारित विकास हाच भारताचा मार्ग असल्याचा स्पष्ट संदेश त्यांनी दिला. आजचा 'मन की बात' कार्यक्रम राष्ट्रप्रेम, सामाजिक जबाबदारी आणि एकात्मतेचा संदेश देणारा ठरला. २०२६मध्ये भारताने अधिक संघटित, सक्षम आणि आत्मनिर्भर बनावे यासाठी प्रत्येक नागरिकाने आपली भूमिका ओळखावी, असे आवाहन त्यांनी केले.'मन की बात' हा कार्यक्रम केवळ सरकारचा उपक्रम नसून तो लोकशाहीचा संवादमंच आहे. या संवादातून पंतप्रधानांनी पुन्हा एकदा देशाच्या मनाशी नाते जोडले. २०२५मधील यशाचा गौरव करत २०२६साठी नवे स्वप्न, नवी दिशा आणि नवा आत्मविश्वास देशाला दिला गेला आहे. येणारे वर्ष या संकल्पाच्या दिशेने प्रवासात एक महत्त्वाचा टप्पा ठरो. तुमचे आणि तुमच्या कुटुंबाचे जीवन आनंदी जावो या इच्छेसह या भागाला निरोप देण्यापूर्वी पंतप्रधानांनी 'फिट इंडिया मुव्हमेंट'चा उल्लेख करीत तुम्हालाही तंदुरुस्त राहावे लागेल. हा हिवाळा व्यायामासाठी खूप योग्य आहे, म्हणून नक्कीच व्यायाम करा, असे आवाहन केले. संपूर्ण कार्यक्रमातून नागरिक, विशेषतः युवा, संस्कृतीसंबंधी विचार, आणि राष्ट्रीय गौरव यांना एकत्रित करण्याचा प्रयत्न प्रभावीपणे केला गेला. अशा प्रकारचे संवाद लोकशाहीच्या आत्म्याशी जोडलेले असतात, जे नागरिकांना देशाच्या दृष्टिकोन आणि उद्दिष्टांबद्दल आशावादी, जबाबदार आणि सजग बनवतात.**

# कर्जत तालुका डुंबतोय भक्तिरसात





कर्जत तालुक्यात अखंड हरिनाम सप्ताहांना सुरुवात झाली आहे. तालुक्यातील ४६ गावांमध्ये अखंड हरिनाम सप्ताहांचे आयोजन केले जाते. या सप्ताहांमध्ये अनेक धार्मिक कार्यक्रम केले जातात. कर्जत शहरापासून ते अगदी तालुक्यातील दुर्गम आदिवासी भागातही अखंड हरिनाम सप्ताहांचे आयोजन केले जाते. नामवंत कीर्तनकार, प्रवचनकारांची उपस्थिती असते. हे चार-पाच महिने कर्जत तालुका भक्तिरसात अक्षरशः डुंबत असतो.

कर्जत तालुक्यातील मोठे वेणगावमध्ये अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. त्यानंतर भाऊ केलटकर, हरिभाऊ वैद्य, विश्वासराव शिंदे, नामदेव दगडे, ह.भ.प. हरिभाऊमहाराज राणे, ह.भ.प. मारुतीमहाराज राणे, वसंत दानवे, सुरेश पिंपरे आदींनी कर्जत तालुका परिसर कर्जतच्या श्री कपालेश्वर मंदिरात अखंड हरिनाम सप्ताह सुरू करण्यात आला. त्यानंतर महिला मंडळाच्या छोटयाशा मैदानात नेण्यात आले. त्याचे स्वरूप इतके वाढले की नंतर ज्ञानेश्वर माऊलींचे सप्त शताब्दी वर्षानिमित्ताचे औचित्य साधून १९९१ सालापासून हा सप्ताह पोलीस मैदानात आयोजन करण्यात येऊ लागले. यावेळी हे सर्व कार्यकर्ते जेष्ठ कीर्तनकार बाबामहाराज सातारकर यांच्याकडे गेले तेथे त्यांनी तुम्ही माळकरी होणार असेल तर मी तुमच्या सप्ताहात दोन दिवस किर्तनासाठी येईन. त्यावेळी विश्वासराव शिंदे, सुरेश पिंपरे यांनी त्यांच्या हस्ते तुळशीच्या माळा गळ्यात घातल्या आणि बाबामहाराज सातारकर कर्जतला आले. त्यांनी दोन दिवस कीर्तन सेवा केली. त्यावेळी कर्जत तालुक्यातीलच नव्हे तर रायगड, ठाणे, पुणे जिल्ह्यातून त्यांचे कीर्तन ऐकण्यासाठी भाविक आले होते.

पंचेचाळीसाव्या वर्षी बाबमहाराज सातारकर यांच्या कन्या ह.भ.प. भगवतीमहाराज सातारकर आणि नातू ह.भ.प. चिन्मयमहाराज सातारकर हे यंदा कीर्तन सेवा देणार आहेत. या सप्ताहाची देणगी रूपाने आर्थिक बाजू सांभाळण्याचे काम चिवडेवाले म्हणून ओळखले जाणारे दत्तात्रेय देशमुख यांच्याकडे होते. सुरुवातीला नामदेव दगडे अध्यक्ष होते. त्यानंतर दामूअण्णा आठवले यांनी १९९० सालापासून अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारली. २००४ साली शिवाजीराव देशमुख हे अध्यक्ष झाले. त्यांच्या निधनानंतर ह.भ.प. नथुराम हरपुडे हे अध्यक्षपद सांभाळत आहेत. ज्ञानेश्वर तिवाटणे यांनी अनेक वर्षे सचिव पद सांभाळले होते. त्यांचे स्मरण करणे क्रमप्राप्त आहे. संतोष वैद्य, नरेंद्र जोशी, गणेश सोनी, मोहन ओसवाल, साजन ओसवाल, वासुदेव इंगळे, वनिता म्हसे, शिवाजी भासे, शिवलाल गुप्ता, दत्तात्रेय म्हसे, अनिल पाटील, चंद्रकांत म्हसे, नंदकुमार कदम, संभाजी देशमुख, अमोल देशमुख, मनिषा सुर्वे, रवींद्र पाठक, अनिल दगडे, ज्ञानेश्वर बागडे, कृपाराम लोवंसी आदी कर्जतच्या अखंड हरिनाम सप्ताहाची जबाबदारी सांभाळत आहेत. हा सप्ताह आता सुरु आहे. निवडणुका असल्या की अनेक जण खर्च करण्यासाठी पुढे येतात. मात्र सेवेकरी त्यांचे फक्त म्हणणे ऐकून घेतात आणि नेहमी प्रमाणे व्यापारीवर्ग तसेच सर्व सामान्यांकडून देणग्या घेऊन हा उपक्रम करीत असतात. कारण निवडणुका झाल्यानंतर पुढील वर्षी पुन्हा देणग्या घेऊनच हा उपक्रम करावा लागेल. यामध्ये सर्वपक्षीय पदाधिकारी व लोकप्रतिनिधींनी हातभार लावला. कुणा एकाला 'तो' बहुमान देणे टाळले.

**खबरबात**
**विजय मांडे**

ह.भ.प. मारुतीमहाराज राणे यांनी कर्जतसह अनेक तालुक्यात कीर्तन सेवा व अखंड हरिनाम सप्ताह सुरू केले. हजारो जणांना व्यसनमुक्त केले. हजारो जणांना माळकरी केले. त्यांची कोंकण दिंडी प्रसिद्ध आहे. त्यांना रायगड मित्र पुरस्कारासह अनेक पुरस्कार मिळाले आहेत. अनेक वारकरी त्यामध्ये सहभागी होतात. आता त्यांचे सुपुत्र ह.भ.प. दिलीपमहाराज राणे त्यांचा वारसा पुढे चालवीत आहेत. ह.भ.प. बाळासाहेबमहाराज फणसे यांनी कर्जत तालुक्यात अखंड हरिनाम सप्ताह सुरू केले. ह.भ.प. वामनमहाराज मोधळे, ह.भ.प. मोरेश्वरमहाराज पेमारे, ह.भ.प. नथुराममहाराज हरपुडे, ह.भ.प. मारुतीमहाराज लोभी, ह.भ.प. भरतमहाराज देशमुख, ह.भ.प. द्वारकानाथमहाराज देशमुख, ह.भ.प. प्रवीणमहाराज फराट, ह.भ.प. हरिश्चंद्रमहाराज जाधव, ह.भ.प. योगिनीमहाराज थरकुडे आदी कीर्तनकारांनी कर्जतमध्ये कीर्तनरुपी सेवेने समाजप्रबोधनाचे काम केले. ह.भ.प. श्रीराममहाराज पुरोहित, ह.भ.प. दिलीपमहाराज राणे हे सुद्धा कीर्तन, प्रवचने करून समाज प्रबोधनाचे कार्य करीत आहेत. या बहुतेक किर्तनकारांना रायगडभूषण पुरस्काराने सन्मानित केले आहे. या सर्व किर्तनकारांना रंभाजीबुवा थोरवे, मनोहर कडू, सुरेश फराट, अनिल फराट हे अजूनही मृदुंगाची साथ देत असतात. तालुक्यात कर्जत, इंजिवली, वेणगाव, तमनाथ आदी अखंड हरिनाम सप्ताह प्रसिद्ध आहेत. या अखंड हरिनाम सप्ताहामुळे सुमारे सहा महिने कर्जत तालुका भक्ती रसात डुंबलेला असतो.

कर्जत परिसराच्या साप्ताहाला ४८ वर्षे झाली. पन्नासाव्या वर्षाची तयारी लवकरच सुरु होणार आहे. एक आगळा वेगळा समारंभ त्यावेळी होईल यात शंका नाही, कारण कर्जतकर नेहमीच धार्मिक कामासाठी पुढे असतात.

# 'रामायण'ची निर्मिती करणारे रामानंद सागर

हिंदू धर्मात 'रामायणा'चे महत्त्व खूप मोठे आहे. प्रत्येक माणसाचा रामायणाशी अगदी जवळचा संबंध आहे. पुराणातील 'रामायण' पहिल्यांदा पडद्यावर दाखवण्याचा काम रामानंद सागर यांनी केलं होतं. आज (२९ डिसेंबर) रामानंद सागर यांची जयंती आहे. 'रामायण' ही मालिका रामानंद सागर यांनी दिग्दर्शित केली होती. या मालिकेमुळे त्यांना घराघरात ओळख मिळाली. पण, रामानंद सागर यांच्यासाठी हा प्रवास अजिबात सोपा नव्हता. या दरम्यान त्यांच्या आयुष्यात अनेक चढउतार आले.

अनेक वर्षांपूर्वी टीव्हीवर 'रामायण' ही मालिका लागायची. आजही या मालिकेची लोकप्रियता तशीच आहे. या मालिकेने प्रेक्षकांच्या हृदयात विशेष स्थान निर्माण केले होते. सर्वांना ही 'रामायण' मालिका खूप आवडायची. 'रामायण' मालिकेची क्रेझ इतकी होती की, 'रामायण' सुरू झाल्यावर रस्त्यांवर शुकशुकाट असायचा. या 'रामायण' मालिकेचे दिग्दर्शन रामानंद यांनी केले होते. रामानंद सागर त्यावेळी प्रचंड लोकप्रिय झाले होते. मात्र, त्यानंतर त्यांचं नावच इंडस्ट्रीमधून गायब झालं.



रामानंद सागर यांचा जन्म २९ डिसेंबर १९१७ला लाहोरमध्ये झाला होता. जन्मा वेळी त्यांचे नाव 'चंद्रमौली' ठेवण्यात आले होते. त्यांचे आजोबा पेशावरहून येऊन आपल्या कुटुंबासोबत काश्मीरमध्ये स्थायिक झाले. रामानंद सागर अवघ्या ५ वर्षांचे असताना त्यांच्या आईचे निधन झाले. रामानंद यांना लहानपणापासूनच वाचनाची आणि लेखनाची आवड होती. वयाच्या १६व्या वर्षी त्यांनी त्यांचे पहिले पुस्तक लिहिले. या पुस्तकाचे नाव होते 'प्रीतम प्रतीक्षा'. त्या काळात रामानंद आपल्या अभ्यासाचा खर्च भागवण्यासाठी छोटी-मोठी नोकरी करत असत. शिपायापासून ते साबण विकण्यापर्यंतचे काम करून त्यांनी आपले छंद पूर्ण केले आणि अभ्यासही पूर्ण केला.

रामानंद सागर यांना लेखनाची इतकी आवड होती की, त्यांनी ३२ लघुकथा, ४ कथा, १ कादंबरी आणि २ नाटके लिहिली. पंजाबमधील दैनिक मिलापचे ते संपादक देखील होते. त्यांनी चित्रपटांमध्ये क्लॅपरबॉय म्हणून काम करायला सुरुवात केली. नंतर रामानंद सागर यांनी पृथ्वी थिएटर्समध्ये सहाय्यक स्टेज मॅनेजर म्हणून काम करायला सुरुवात केली. यानंतर हळूहळू त्यांनी बॉलिवूडमध्ये आपले नाव कमावले. (साभार : इंटरनेट)




# सॅमसंग स्मार्टफोनच्या सुरक्षेसाठी नवीन सिक्युरिटी फिचर

सॅमसंग गॅलेक्सी स्मार्ट फोनने त्यांच्या OneUI या अँड्रॉईड व्हर्जनच्या नवीन अपडेटवर काम केलेले दिसते. अँड्रॉईड १४ OSच्या अनेक नवीन फिचर्स, क्विक सेटिंग पॅनल्स आणि यामधील अनेक दुरुस्त्या लक्षात घेता या कंपनीने नुकतेच OneUI ६ हे नवीन अपडेट आणलेले आहे. या नवीन OneUI ६ अपडेटसह सॅमसंगने अनेक नवीन सिक्युरिटी फिचर्सदेखील आणले आहेत, ज्यामुळे सॅमसंग गॅलेक्सीचे स्मार्ट फोन्स अँड्रॉईड १४ वरदेखील अगदी सुरळीत चालतील आणि अधिक सुरक्षितसुद्धा असतील, असे समजते. या सिक्युरिटी फिचरचे नाव आहे 'ऑटो ब्लॉकर.'



सॅमसंगच्या या ऑटोब्लॉकरमुळे OneUI ६ ची सुरक्षितता अधिक वाढते. तुमच्या फोनमध्ये काही वेगळे घडत असेल, फोन हॅक होत असेल, तर फोनला त्याबद्दल जाणीव होऊ शकते. जेव्हा ऑटो ब्लॉकरची सेटिंग चालू केली जाते, तेव्हा एखाद्या अनऑथराईज्ड सोर्सचे ॲप इन्स्टॉलेशन ब्लॉक करणे, सिक्युरिटी चेक सुरू करणे, आणि USBच्या कमांड्स बंद करणे अशा सर्व गोष्टी या ऑटो ब्लॉकरमुळे केल्या जातात, ज्यामुळे तुमच्या चार्जिंग पोर्टद्वारे किंवा कोणत्याही कोडच्या मदतीने एखाद्या चुकीच्या ॲपला फोनमध्ये येण्यापासून बचाव करण्यास मदत होते.

या नवीन तंत्रज्ञानाच्या सुरक्षेमुळे, मेसेजेसमध्ये एखादा मालवेअर फोटो आला असल्यास तोदेखील ताबडतोब ब्लॉक करून टाकण्यास मदत केली जाते, परंतु ही सेटिंग फोनमध्ये काशी सुरू करायची ते पाहा.

ऑटो ब्लॉक असे सुरू करावे. OneUI ६ आधारित अँड्रॉइड जड १४ सॅमसंग फोनमधील ऑटो ब्लॉक सेटिंग सुरू करण्यासाठी, सर्वप्रथम सेटिंग्जमध्ये जावे. तेथील सिक्युरिटी अँड प्रायव्हसी हा पर्याय निवडावा. नंतर ऑटो ब्लॉकरवर क्लिक करून, टर्न ऑनवर क्लिक करावे. संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी सॅमसंग हे Mac-fee तंत्रज्ञानाचा उपयोग करीत आहे. त्यामुळे हे सेटिंग वापरण्यासाठी वापरकर्त्यांना त्यांची लायसन्स अँड प्रायव्हसी पॉलिसी एक्स्पेट करावी लागेल. ऑटो ब्लॉकर ही सेटिंग जरी फोनची सुरक्षितता वाढवत असली, तरीही त्याचे काही तोटेसुद्धा आहेत. जसे की, कोणतेही अनऑथोराइज्ड ॲप साईडलोड करता येणार नाही. त्यासोबतच कॉम्प्युटरवरून सॉफ्टवेअर अपडेट करता येणार नाही.

# मराठी गायकनट मास्टर दिनानाथ मंगेशकर

प्रख्यात मराठी गायकनट. संगीत रंगभूमीच्या सुवर्णयुगाचा एक प्रतिभावंत शिल्पकार, एका अनुपम मोहक अशा रससशीत गानशैलीचा कल्पक उद्गाता, प्रथम श्रेणीच्या मौजक्या गायकनटांपैकी एक अतुलनीय तेजस्वी व मनस्वी व्यक्तिमत्त्व म्हणजे मास्टर दीनानाथ मंगेशकर. त्यांचा जन्म २९ डिसेंबर १९०० रोजी गोव्यातील मंगेशी येथे जन्म. तेथील निसर्गसम्य परिसरात दीनानाथांचे बालपण गेले.

श्री मंगेश देवस्थान येथील उपाध्ये-पुजारी गणेशपंत नवाथे (अभिषेकी) हे त्यांचे वडील व येसूबाई (पूर्वाश्रमीच्या राणे) मातोश्री होत. त्यांना उपजतच उंच, खणखणीत, सुरेल व भिंगरीसारखी फिरत असलेला असामान्य आवाज व अस्खलित वाणी लाभली होती. बालपणीच त्यांचा नावलौकिक 'किर्लोस्कर नाटक मंडळी'सारख्या श्रेष्ठ नाट्यसंस्थेच्या चालकांच्या कानावर गेला आणि केवळ चौदा वर्षांच्या दीनानाथांना बालगंधर्वांसारख्या अलौकिक गायकनटाची जागा भरून काढण्यासाठी पाचारण करण्यात आले. किर्लोस्कर मंडळीच्या ताजे वफा, काँटोंमें फूल इ. हिंदी-उर्दू नाटकांतील दीनानाथांच्या संगीत भूमिका विलक्षण लोकप्रिय ठरल्या. आपल्या विशाल, पाणीदार नेत्रांच्या, देखण्या व प्रसन्न व्यक्तिमत्त्वाने व निर्भर अशा मुक्त गायनाने त्यांनी रंगभूमी गाजवून सोडली. अच्युतराव कोल्हटकरांनी दीनानाथांना 'मास्टर' हे उपपद लावले.




**निमित्त**

मास्टर दीनानाथ हे 'बलवंत संगीत मंडळी'चे (स्थापना १९१८) प्रमुख मालक-भागीदार होते. या नाटक मंडळीने मनोरंजनाबरोबरच बोध, देशभक्ती, समाजसुधारणा यांचे दर्शन घडवणारी राम गणेश गडकरी, वीर वामनराव जोशी, स्वातंत्र्यवीर सावरकर, वासुदेव शास्त्री खरे, विश्राम बेडेकर इ. अग्रगण्य नाटककारांची नवनवीन नाटके रंगभूमीवर आणली. तसेच जुनी गाजलेली नाटकेदेखील बलवंतच्या रंगभूमीवर होत असत. 'गंधर्व' आणि 'ललितकलादर्श' अशा प्रस्थापित नाटक मंडळ्यांबरोबर बलवंतने स्वतःचे स्वतंत्र स्थान निर्माण केले.

दीनानाथांच्या गाण्यांतून व अभिनयातून वीर, शृंगार, शांत हे रस प्रामुख्याने प्रत्ययास येते. मृदुलमधुर गानवृत्तीचे बालगंधर्व व प्रखर आक्रमक गानपद्धतीचे केशवराव भोसले हे चंद्र-सूर्य तळपत असतानाच तेजस्वी शुक्रासारखे दीनानाथ रंगभूमीवर आले. यांपैकी कुणाचेही अनुकरण न करता, स्वतःचे स्वतंत्र आणि चमत्कृतीपूर्ण, पण अत्यंत भावमधुर व काळजाला भिडणारे गाणे गाऊन गेले, यातच दीनानाथांचे महत्त्व व मोठेपण सामावले आहे. मराठी नाट्यसंगीतावर बालगंधर्वप्रमाणेच दीनानाथांच्या गानपद्धतीचा ठसादेखील स्पष्टपणे उमटलेला आढळतो. नाट्यगीतांप्रमाणे शास्त्रोक्त संगीतही दीनानाथ उत्तम प्रकारे, स्वतःच्या स्वतंत्र व कल्पक वळणाने गात असत. त्यांनी नाट्यसंगीतात पंजाबी ढंग प्रथम आणला असे मानले जाते. आकाशवाणीच्या मुंबई केंद्रावरून निराळे. सुंदर गाणे रसिकांना ऐकवले. गायनाचार्य रामकृष्णबुवा वझे यांचे ते गंडाबंद शागीर्द होत तथापि त्यांनी स्वतःची स्वतंत्र शैली घडवली.

१९३४मध्ये 'बलवंत पिक्चर कॉर्पोरेशन' काढून त्यांनी चित्रपटसृष्टीत प्रवेश केला. कृष्णार्जुन युद्ध हा त्यांचा पहिला चित्रपट. त्यात त्यांनी अर्जुनाची भूमिका केली. त्यांची 'सुहास्य तुझे मनासि मोही' यासारखी या चित्रपटातील गाणी अतिशय लोकप्रिय झाली. दीनानाथांचे कावीळ, जलोदराच्या विकाराने २४ एप्रिल १९४२ रोजी पुण्यात अकाली निधन झाले. **-प्रभाकर जठार**

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# थंडीमध्ये अळिवाचे लाडू खाणे फायदेशीर

हिवाळ्याच्या दिवसांमध्ये मुंबईतील अनेक नामवंत पदार्थ विक्रेत्यांच्या दुकानाबाहेर विशेषतः लाडू विक्रेत्यांकडे अळिवाचे ताजे लाडू खाणाऱ्यांची संख्या वाढलेली दिसते. हिवाळ्यात हे लाडू खाणे फायदेशीर ठरते.

अळिवाचे नारळाच्या पाण्यात शिजवून तयार केलेले खमंग लाडू पौष्टिक, औषधी आणि चविष्ट असतात. तेलबियांपैकी एक म्हणून प्रसिद्ध असणाऱ्या अळिवाला वेगवेगळ्या भाषांमध्ये विविध नावांनी ओळखले जाते. मराठीत अहाळीव किंवा हलीम, हिंदी, बंगालीमध्ये हलीम, गुजरातीमध्ये अशेळीयो अशी अळिवाची विविध नावे आहेत. संस्कृतमध्ये चंद्रशूर आणि इंग्रजीत गार्डन क्रेस सीड्स नावाने ओळखले जाणारे अळिव आहार शास्त्रातदेखील त्याच्या गुणकारी गुणधर्मांमुळे प्रसिद्ध आहेत.



अळिवामध्ये उत्तम प्रमाणामध्ये लोह असते. विशेषतः यातील लोहाचे प्रमाण शरीरातील हिमोग्लोबिन वाढविण्यासाठी आणि पूर्ववत राखण्यासाठी अत्यंत उपयुक्त असते. लोहाव्यतिरिक्त कॅल्शियम, फॉलिक ॲसिड, बीटा कॅरोटीन यासारखी पोषणमूल्ये अळिवाचे आहारातील महत्त्व वाढवितात. खरेतर इथिओपियामध्ये सापडणारी ही आयुर्वेदिक वनस्पती आहे, मात्र भारतातदेखील अळीव मोठ्या प्रमाणात उगवते. ही वनस्पती अत्यंत गुणकारी आहे.

भारतामध्ये मुख्यत्वे हिवाळ्याच्या दिवसांमध्ये अळिवाचे लाडू तयार केले जातात, यामध्ये एक सगळ्यात महत्त्वाचा मुद्दा हा आहे की अळिव शक्तीवर्धक आणि रेचक आहे. अनेकदा सलाडमध्ये अंकुरलेले अळिव घातलेले दिसतात. जीवनसत्व अ आणि क युक्त अंकुरित अळिव डोळ्यांच्या आरोग्यासाठी अत्यंत उपयुक्त आहेत. मलावरोध असणाऱ्यांसाठीदेखील अळिवाची पाने किंवा अळिवाचे पाणी गुणकारी आहे.

तुम्ही अळिव कसे खाताय, अळिवाबरोबर कोणते पदार्थ करताय याने अळिवातील लोहाचे प्रमाण आणि जीवनसत्त्व 'क'चे प्रमाण अवलंबून असते. अळिवाचे लाडू तयार करताना नेहमी ओले खोबरे किंवा नारळ यांच्याबरोबरीने तयार केले जातात. एक महत्त्वाची गोष्ट इथे जाणून घेणे अत्यंत आवश्यक आहे की अळिवाबरोबर कधीही हळद, आले, लसूण यांचा वापर करू नये. अळिवाबरोबर ज्या वेळेला तुम्ही हे पदार्थ वापरतात त्याला अळिवातील लोह शरीरात एकत्र करण्यासाठी अडथळा येऊ शकतो. शिवाय ज्यांना थायरॉईडचा त्रास आहे त्यांनी मात्र अळीव खाणे कटाक्षाने टाळावे.

# शिक्षण परिषदेच्या नावाने शिक्षकांचे माथेरान पर्यटन

## खालापुरातील शिक्षक, शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांसह केंद्रप्रमुखांचाही सहभाग

**खालापूर : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद शाळा हशाची पट्टी येथे शिक्षण परिषदेला केंद्रातील शिक्षकांबरोबर इतर शिक्षकांनी हजेरी लावल्याने खळबळ उडाली आहे,हे ईतर शिक्षक शिक्षण विस्तार अधिकारी यांच्या समवेत गेले अशीही चर्चा सुरु झाली आहे.याबाबत वरिष्ठ यांना काहीच माहिती नसल्याचे त्यांनी सांगितले, पण चौकशी करण्यात येईल असेही सांगितले.



हशाचीपट्टी येथे शिक्षकांची बदली झाली तर कुणीच तयार होत नाही, असे बोलले जाते, आजही तो भाग अतिशय दुर्गम असून खालापूर तालुक्यात असलेल्या शाळेला कर्जत तालुक्यातून जावे लागते,तेही दोन ते तीन तास चालून. राजिप शाळा हशाची पट्टी येथे वावरले व जांबरुंग या केंद्रांची संयुक्त शिक्षण परिषद घेण्यांत आली होती. यावेळी ८० ते ८५ शिक्षक या परिषदेला उपस्थित राहण्यांची परवानगी गट शिक्षणाधिकारी यांनी दिली होती. तसेच माथेरान येथे प्रवासी पर्यटन शुल्क आकारण्यात येऊ नये म्हणून पत्र व्यवहार झाला होता, मात्र या दोन केंद्र यांच्या बरोबर अन्य केंद्रातील शिक्षक गेल्याने नाराजी व्यक्त करण्यात आली आहे. खालापूर तालुक्यातील केंद्र प्रमुख आणि शिक्षक उपस्थित राहिल्यामुळे एकच चर्चेला उधाण आले आहे.

ही शिक्षण परिषद ही निसर्ग रम्य थंड हवेचे ठिकाण माथेरान पायथ्याशी अतिशय दुर्गम भागात होती.माथेरान येथून साधारण दोन अडीच तास पायी प्रवास करून जावे लागते. तीव्र उत्तार, अश्या स्वरूपाचा मार्ग असून शाळेत जाण्यासाठी मोठी कसरत करावी लागते. मात्र काही शिक्षक शाळा बुडवून आणी शाळेला दांडी मारून शिक्षक व केंद्रप्रमुख माथेरानचा आनंद लुटण्यासाठी गेले होते की शिक्षण परिषदेचा अभ्यास करण्यासाठी गेले होते, विशेष म्हणजे शिक्षण विस्तार अधिकारी तेथे हजर असून ही त्यांनी विचारणा का केली नाही? म्हणूनच अन्य शिक्षकांनी नाराजी व्यक्त केली.

शिक्षकांना निमंत्रण होते की नव्हते हे तपासले जाईल किंवा ते रजा टाकून गेले होते का, शाळेला सुट्टी घेऊन गेले होते का? त्याच बरोबर केंद्र प्रमुख गेले असतील तर ठीक आहे. तसेच यापुढे प्रत्येक शिक्षकाला समज दिली जाईल आणि सोमवारी चौकशी करण्यांत येईल,असे गट शिक्षणाधिकारी दीपा परब यांनी सांगितले.या चर्चेचे कारण शिक्षण क्षेत्रात अनेक संघटना सक्रीय झाल्या असून एकमेकांवर कुरघोडी करण्याचा प्रयत्न करीत आहेत यात विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची अबाळ होऊ नये एवढीच पालकांची अपेक्षा आहे.

### मंगेश काळोखे हत्याकांड प्रकरण

## नामसाधर्म्याने खोपोलीत गोंधळ

**खालापूर : प्रतिनिधी**

खोपोलीतील घटनेने महाराष्ट्र ढवळून निघाला आहे राजकीय आरोप प्रत्यारोप व राष्ट्रवादी काँग्रेसच्या जिल्हाध्यक्ष व संपर्क प्रमुखाचे नांव हत्याकांडातील एफआयआर मध्ये आल्याने सत्ताधारी पक्षातील कलगीतुरा व राज्याच्या उप प्रमुखांनी पिडीत कुटुंबाची सांत्वनासाठी घेतलेली भेट, राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षांनी आरोप असलेल्या जिल्हाध्यक्षासाठी कर्जत मधील पक्ष कार्यालयात आरोपीचे केलेले समर्थन तसेच चुकीने पोलीसांनी दबावाखाली केलेला एफआयआर या बाबत थेट मुख्यमंत्री व गृहमंत्री यांची भेट घेऊन अन्याय होत असल्याची भावना व्यक्त करणे, एस आय टी मार्फत चौकशी

या घडामोडी राज्याच्या सत्ताधारी गटाची व राजकारणाची दिशा आणि दशा दर्शवणारी ठरत असताना खोपोलीतील एका बातमी खोपोलीकरांना हळहळ व जोराचा झटका देणारी ठरली.

रायगड पोलीसांनी हत्याकांडातील संशयित ९ आरोपींना अटक केल्याची नाव जाहीर करण्यात आली. पैकी ९ नंबर चा आरोपी दिलीप हरीभाऊ पवार हे नाव येताच खोपोली खालापूर करांच्या भुवया उंचावल्या तर काहींची झोप मोडली. दिलीप हरीभाऊ पवार रा. रहाटवडे साईबाबा नगर हे पत्रकार क्षेत्रातील अबोल व्यक्तीमत्व , कधीही वादग्रस्त नाही, कोणालाही साधी शिवीगाळ नाही, गरजवंताला मदतनीस ठरणारे खोपोलीकरांचे दिलीपभाऊ तसेच गेली २५ वर्षे पत्रकारितेत निष्कलंक कार्य, वृत्तपत्र विक्रेते दिलीप पवार हे हत्याकांडातील संशयित म्हणून अटक केली ही बातमी वाऱ्यासारखी खोपोलीत पसरली आणि भल्या पहाटे फोन खणखणू लागले तर खोपोली पोलीस ठाणे व डॉ बाबासाहेब आंबेडकर स्मारक परीसरात विचारपूस करण्यासाठी हितचिंतक, पत्रकार , वृत्तपत्र वाचक व नातेवाईक यांची रिघ लागली. पवार असं करुच शकत नाहीत असा सुर उमटू लागला.

काही झालं तरी दिलीप पवार यांच्या मागे उभे राहण्याचा निर्धार केला गेला. पवार भारतीय जनता पार्टीचे खोपोली शहर उपाध्यक्ष असल्याने पवारांना भाजप कार्यकर्त्ये मनोधैर्य वाढविण्यासाठी मेसेज येऊ लागले काही प्रत्यक्ष जातीने हजर राहीले .

मात्र हत्याकांडातील संशयित आरोपी दिलीप पवार या नावात साधर्म्य असुन दिलीप हरीभाऊ पवार हा आरोपी वाशी नवी मुंबई येथील मुख्य आरोपींचा जवळचा स्नेही असल्याचे समोर आल्याने हितचिंतकांनी सुटकेचा निःश्वास सोडला.

## माणगावच्या हर्ष चोगलेची भारतीय सैन्यात निवड

### खांदाड ग्रामस्थांकडून भावस्पर्शी सत्कार

**माणगाव: बातमीदार,प्रतिनिधी**

देशसेवेचे स्वप्न उराशी बाळगून कठोर परिश्रम, जिद्द आणि आत्मविश्वासाच्या बळावर यश संपादन करणाऱ्या माणगाव शहरातील खांदाड गावातील सुपुत्र हर्ष गणेश चोगले याची भारतीय सैन्यात नुकतीच निवड झाली आहे. या अभिमानास्पद यशाबद्दल खांदाड गावातील ग्रामस्थांनी सोनभैरव मंदिरात एकत्र येत हर्ष चोगले याचा अत्यंत भावस्पर्शी सत्कार केला.

लहानपणापासूनच भारतीय सैन्यात भरती होण्याचे स्वप्न हर्षने मनाशी जपले होते. शिक्षण पूर्ण केल्यानंतर केवळ स्वप्न पाहून न थांबता, त्या स्वप्नासाठी त्याने स्वतःला झोकून दिले. खडतर सराव, शिस्तबद्ध जीवनशैली आणि अपार कष्टांच्या जोरावर हर्षने भरती चाचणीत यश मिळवले. त्यानंतर गोवा येथे सहा महिन्यांच्या कठीण सैन्य प्रशिक्षणासाठी त्याची निवड झाली. सध्या त्याची राजस्थान राज्यातील जयपूर येथे पोस्टिंग झाली असून तो लवकरच भारतीय सैन्यात प्रत्यक्ष दाखल होणार आहे.

हर्ष चोगले हा येथील सामाजिक युवा कार्यकर्ते कृष्णा दिवेकर यांचा भाचा आहे. सत्कार समारंभावेळी माजी नगराध्यक्ष ज्ञानदेव पोवार, काशिराम पोवार,आजी कल्पना दिवेकर कृष्णा दिवेकर, महेश पवार, मारुती मालोरे, रविंद्र पारखे, हर्षची आई गायत्री चोगले, वडील गणेश चोगले, तसेच मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.



## रोड बुद्रुक गावातील ३५ विद्यार्थ्यांना मोफत सायकल वाटप




**धाटाव : प्रतिनिधी**

पक्षातील युवा नेतृत्व , वरिष्ठ व ज्येष्ठ नेते प्रामाणिकपणे काम करत असताना समाजातील विविध प्रश्नांना हात घालणे ही आजच्या काळाची गरज आहे. राजकारण करताना केवळ पदे, सत्तास्थाने किंवा पगार महत्त्वाचे नसून समाजासाठी काहीतरी करण्याचे स्वप्न, ते पूर्ण करण्याची जिद्द आणि सातत्यपूर्ण कष्ट अधिक महत्त्वाचे आहेत, असे ठाम प्रतिपादन शिवसेनेचे आमदार महेंद्र दळवी यांनी रोठ बुद्रुक येथील विद्यार्थ्यांना सायकल वाटप करण्याच्या कार्यक्रमात वक्तव्य केले. मैत्री प्रतिष्ठान व शिवसेनेच्या माध्यमातून गावातील ३५ विद्यार्थ्यांना त्यांच्या हस्ते मोफत सायकली वाटप करण्यात आल्या .

यावेळी दळवी पुढे म्हणाले की , निलेश वारंगे यांचे एकंदरीत कारकीर्द पाहता त्यांनी समाजकारणाची सुरुवात म्हणून केली असून, कार्यकर्त्यांच्या निष्ठावान साथीतून आणि त्यांच्या मेहनतीच्या जोरावर राजकारणात एक पाऊल पुढे टाकता आले, असा भावनिक उल्लेख यावेळी करण्यात आला. लोकांची सेवा करणे हेच खरे राजकारण असून, त्यात अभिमान बाळगण्यासारखे निश्चितच काही आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

राजकारणातील सर्व प्रश्न हे चर्चा व संवादातूनच सुटतात. मतभेद असले तरी संवाद कायम ठेवणे ही काळाची गरज असून, येणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत निवडणुकांसाठी सर्व कार्यकर्त्यांनी आतापासूनच सज्ज राहावे, असे आवाहन करण्यात आले.

मैत्री प्रतिष्ठान व शिवसेना विभागाच्या वतीने रोठ बुद्रुक गावातील ३५ विद्यार्थ्यांना मोफत सायकलींचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शाळा व महाविद्यालयात ये–जा करणे अधिक सुलभ होणार असून, हा उपक्रम समाजोपयोगी असल्याचे उपस्थितांनी सांगितले. या कार्यक्रमास शिवसेना नेते छोटम भोईर, तालुका प्रमुख मनोजकुमार शिंदे, भाजपाचे रोहा तालुका अध्यक्ष अमित घाग उपतालुका प्रमुख संदेश मोरे, उद्देश वाडकर,दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष प्रमोद घोसाळकर उपस्थित होते

## वऱ्हाड जांभूळपाडा येथे अंबा नदीपात्रात आढळला मृतदेह



**पाली : प्रतिनिधी**

रायगडच्या सुधागड तालुक्यातील पाली खोपोली राज्य महामार्गालगत वऱ्हाड जांभूळपाडा नदीच्या लहान पुलाच्या नदी पात्रात एका इसमाचा मृतदेह आढळून आला. त्यामुळे तालुक्यात एकच खळबळ उडाली. सदर मृतदेह कुणाचा ही ओळख अद्याप पटली नाही.

काही दिवसांपूर्वी सुधागडात एका वृद्ध महिलेचा मृतदेह सापडला होता. त्यानंतर नदी पात्रात हा मृतदेह सापडल्याने नागरिकांत चर्चेचा विषय ठरला आहे.सदर मृतदेह पहायला सकाळी लोकांनी खुप गर्दी केली होती .

याबाबत नागरिकांनी पाली व जांभूळ पाडा दुरक्षेत्रातील पोलिसांना या घटनेची माहिती देताच पोलीस तात्काळ घटनास्थळी पोहचले व मृतदेह बाहेर काढून त्याची ओळख पटविण्यासाठी प्रयत्न करीत आहेत.

या संदर्भात पाली पोलीस निरीक्षक हेमलता शेरेकर यांनी सदर मृतदेह पुरुषाचा असून त्याची ओळख अद्याप पटली नसल्याची माहिती दिली. पुढील पोलीस तपास सुरू असून नागरिकांनी सहकार्य करावे असे आवाहन पो.नि. शेरेकर यांनी केले.

# पाणी मिळत नसल्याने ओलिताखालील शेती धोक्यात

## १५ डिसेंबरला पाणी सोडण्याचे आश्वासन हवेत विरले

**रोहा : रामप्रहर वृत्त**

रोहा तालुक्यात कोलाड पाटबंधारे विभागाचे कालव्याचे पाणी अनेक वर्षांपासून दुरुस्तीच्या नावाखाली बंद असल्याने विभागातील शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे पाणी सोडण्याची मागणी अनेकदा केली मात्र त्याकडे दुर्लक्ष होत असल्याचे पुन्हा दिसून येत आहे. येथील विभागीय शेतकऱ्यांनी याबाबत प्रशासनाला अनेकदा निवेदन दिले आहे आणि पाणीपुरवठा सुरू करण्याची मागणी केली. मात्र त्यावर पाटबंधारे खात्याचे केवळ आश्वासनेच दिली. या चुकीच्या धोरणांमुळे ओलिताखाली येणारी शेतजमीन नापीक होण्याच्या मार्गावर असल्याचे दिसून येत आहे त्यामुळे येथील बळीराजा आता अक्षरशः संतापाच्या भूमिकेत असल्याचे दिसून येत आहे.



कुंडलिका सिंचन डोळवहाळ बंधारे रोहा तालुक्यातील सुरू असलेले उजवातीर डावातीर कालवा गेली अनेक वर्ष दुरुस्तीच्या नावाखाली बंद असल्याने पाटाच्या ओलिताखालील उजवातीर कालवा खांब, देवकान्हे, धामणसई या विभागातील शेतकऱ्यांना डोळवहाल सिंचनातून कोलाड पाटबंधारे विभाग अनेक वर्षे पाणी देत नाही. संबंधित कालवा दुरुस्तीची कामे करण्यात आली असली तरी शेतकऱ्यांना पाणी मिळत नाही.तर येत्या वर्षात तसेच येथील देवकान्हे, धानकान्हे, चिल्हे, तळवली तर्फे अष्टमी या शेतकरी ग्रामस्थानी एकत्रित येऊन एकजुटीने खात्याला ऑक्टोबर नोव्हेंबरमध्ये कालव्यातील गाळ कचरा साफसफाई वेळेत पूर्ण करून उन्हाळी हंगामातील भातशेती लागवडीसाठी डिसेंबरपर्यंत पाणी सोडण्यासाठी आग्रही मागणी निवेदनातून केली होती.

निवेदन दिले तेव्हा शेतकऱ्यांना दिलासादायक आश्वासन देत लगेचच कालव्याची सफाई करण्यात येणार आणि डिसेंबर १५ पर्यंत पाणी सोडले जाईल असे सांगण्यात आले तर कालव्याची साफसफाई होऊन तब्बल महिना उलटून गेला डिसेंबर महिना देखील संपला तरी अद्याप कालव्याला पाण्याचा पत्ता नाही

त्यावर कुठे माशी शिंकली शेतकऱ्यांना शेतीसाठी पाणी नाही व्यापारी धोरणांसाठी आहे का असा सवाल उपस्थित होत आहे. गेली पंधरा वर्षे पाटबंधारे खात्याच्या आडमुठेपणाच्या धोरणांमुळे शेतकऱ्यांची शेती उद्ध्वस्त होतेय. १५ डिसेंबरला पाणी सोडण्याचं आश्वासन दिलं, पण कुठे माशी शिंकली? शेतीची कामं लांबणीवर पडली. जबाबदार कोण?पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंते आणि वरिष्ठ अधिकारी मुख्यतः जबाबदार आहेत. त्यांचा हलगर्जीपणा आणि दुर्लक्ष शेतकऱ्यांना पाण्यापासून वंचित ठेवतंय.यामुळे रब्बी हंगामाच्या पिकांची पेरणी रखडली. शेतकऱ्यांचं नुकसानशेतीची कामं उशिरा होतायत, उत्पादन घटणार. धनिकांना प्राधान्य, साध्या शेतकऱ्यांना दुर्लक्ष. कालव्याची साफसफाई कामे देखील पूर्ण झाली असल्याचे दिसून येत आहे तर धरणात पाणी असूनही उपासमार शेतकरी राजाची होते अशी स्थिती निर्माण होत आहे.

दरम्यान, कोलाड पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता तो होऊ शकला नाही.

## चौक विद्यालयात क्रीडा पारितोषिक वितरण समारंभ

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

विद्या प्रसारिणी सभा, चौक संचलित सरनौबत नेताजी पालकर विद्यामंदिर व यशवंतराव देशमुख कनिष्ठ महाविद्यालय, चौक वार्षिक क्रीडा पारितोषिक वितरण समारंभ आंतरराष्ट्रीय भालाफेक खेळाडू आनंद जितेकर यांच्या हस्ते व विद्या प्रसारिणी सभा, चौक संस्थेचे सेक्रटरी योगेंद्रभाई शहा यांच्या अध्यक्षतेखाली अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी आंतरराष्ट्रीय भालापेक खेळाडू आनंद जितेकर, सहकारी क्रीडा प्रशिक्षक वैभव पाटील, कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा संस्थेचे सेक्रेटरी योगेंद्र शहा, रायगड जिल्हा आदर्श शिक्षक राजाराम नलावडे, संस्थेच्या कार्याध्यक्षा शोभा देशमुख, उपकार्याध्यक्ष नरेंद्र शहा, संचालिका ऐश्वर्या जोशी, संचालक दिवेश शहा, संचालिका सुलभा गायकवाड, माजी उपसरपंच सुभाष पवार, मुख्याध्यापक गायकवाड, उपमुख्याध्यापिका योजना म्हात्रे, पर्यवेक्षक देवानंद कांबळे, शिक्षक प्रतिनिधी हर्षदा जाधव, दिपाली आटोळे, उदय देशमुख आदी सर्व मान्यवरांचे स्वागत आयोजकांच्या वतीने गुलाबपुष्प देऊन करण्यात आले.

सालाबादप्रमाणे यावर्षी देखील विद्यार्थ्यांच्या क्रीडास्पर्धेच्या पारितोषिकांचा सर्व खर्च डॉ.सचिन सुधीर देशमुख यांनी केला आहे. जिल्हास्तरीय व विभागस्तरीय स्पर्धेत विशेष प्राविण्य प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना प्रत्येकी ५०० रुपये रोख रक्कम व सन्मानचिन्ह रायगड जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त सेवानिवृत्त क्रीडाशिक्षक राजाराम नलावडे यांच्या वतीने मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.



**TENDER NOTICE**

**Subject : Appointment of Consultant for Painting Work**
**Ref :- as decided in AGM on 28.09.2025**

As per above reference, as decided in AGM, members have given rights to committee members to appoint a consultant for painting work by inviting applications hence Members are hereby informed that the Managing Committee of **Moraj T1 T2 T3 T4 Type CHSL** intends to appoint a qualified and experienced consultant for supervising and guiding the upcoming **external and/or internal painting work** of our society buildings.

**The scope of the consultant's work will include :**

- Assessing the current condition of the building surfaces.
- Preparing a detailed estimate and work specification.
- Assisting in selection of quality materials and shades.
- Preparing tender documents and assisting in contractor selection.
- Supervising the work to ensure quality and timely completion.
- A consultant will prepare and submit the required documentation to the Cooperative Housing Society, ensuring full compliance with any type of audit.

Interested and eligible consultants are requested to submit their **profile, experience details, and professional fees** in a sealed envelope to the Society Office on or before **08.01.26** during office hours.

MC has the rights to terminate the appointment if any discrepancies occurred.

For further details, please contact the Society Office at **Mobile 9967799779 / 9833555169 or email- morajt1234@gmail.com.**

Moraj/t1234/12-1

By Order of the Managing Committee,
For **Moraj T-1, T-2, T-3, T-4, Type CHS. Ltd**.
Moraj Riverside Park
Plot No. 448, 448-A,449/2, Behind T-4
Wing, Takka, Panvel - 410206

**Sd/-**
(Chairman / Secretary / Treasurer)

Date : 28/12/2025

# वीज जोडणीअभावी सीसीटीव्ही बंद

## उरण पोलिसांचा प्रशासनाकडे पत्रव्यवहार

## तालुक्यावर असणार १०७ कॅमेऱ्यांची नजर

**उरण : रामप्रहर वृत्त**

वाढत्या गुन्ह्यांची उकल करण्यासाठी उरण पोलिसांनी उरण तालुक्यात १०७ सीसीटीव्ही कॅमेरे बसविले आहेत, मात्र यासाठी आवश्यक असलेली वीज जोडणी विविध विभागाकडून मिळत नसल्याने हे कॅमेरे बंद आहेत. ते त्वरित सुरू करावी यासाठी उरणचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हनिफ मुलाणी विविध आस्थापणानाशी पत्रव्यवहार केला आहे, अशी माहीती त्यांनी दिली आहे. यासाठी उरण तालुक्याचे चार भाग करण्यात आले आहेत.

यात उरण शहर, बोकडवीरा, कोप्रोली आणि जासई असे हे विभाग असून येथील पोलीस, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी तसेच सामाजिक कार्यकर्ते आणि पत्रकार यांचा समावेश असणारे समाजामध्यम गट तयार करण्यात आले आहेत. यातून विभागीय माहीती पोलीस यंत्रणेला अपेक्षित आहे. त्यासाठी नागरिकांनी पोलिसांनी सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. त्यामुळे येथील वाढते गुन्हे समाज विघातक कृत्य यांना आळा घालण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. यात उरण नगर परिषद परिसरातील १०७ सीसीटीव्ही कॅमेरे पुढील आठवड्या पासून सुरू होणार आहेत.

शहर बिट मध्ये २८ कॅमेरा, चिरनेर बिट, जासई, बोकडविरा प्रत्येक बिटमध्ये २५ कॅमेरे यातील अटल सेतू परिसरात १२, नगर परिषद १०५ द्रोणागिरी, राष्ट्रीय महामार्ग १२ ओएनजीसी -६ सिडको विभाग १६ असे कॅमेरे आहेत. तर या चार खाजगी बिट मध्ये एकूण १०० कॅमेरे निश्चित करण्यात आले आहेत. यातील उरणच्या रेल्वे व सिडको द्रोणागिरी परिसरात कॅमेरे बसविण्यात आले आहेत, मात्र या कॅमेऱ्याना वीज जोडण्या नसल्यामुळे बंद आहेत.

एक कॅमेरा जनतेसाठी मोहीम : उरण पोलीस विभागाने उरण शहर व तालुक्यातील अनेक सहकारी गृहनिर्माण संस्था तसेच खाजगी दुकानात बसविण्यात आलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या दिशा बदलून त्या पोलीस तपासात उपयोगी पडतील आशा दिशेने वळवून घेण्यात आले आहेत. या मोहिमेला एक कॅमेरा जनतेसाठी असे नाव देण्यात आले असल्याची माहीती यावेळी हनिफ मुलाणी यांनी दिली आहे.

जुलै २०२४ मध्ये उरण- पनवेल या रहदारीच्या मार्गावर झालेल्या तरुणीच्या हत्याकांडानंतर उरणकरांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला होता. तर, मागील अनेक वर्षापासून उरण शहर आणि परिसरातील सीसीटीव्ही बंद असल्याचे समोर आल्याने उरणमधील



महिला आणि रहिवाशांची सुरक्षितता रामभरोसे असल्याचे चित्र होते. याकडे उरण नगर परिषद व सुरक्षा यंत्रणेचेही दुर्लक्ष व दिरंगाई होतांना दिसत होती.

मुंबई आणि उरण तालुक्याला जोडणाऱ्या अटल सेतू आणि रेल्वे सेवेमुळे हे अंतर अवघ्या ३० ते ४० मिनिटांवर आले आहे. त्यातच, उरण तालुक्यातील वाढते व्यवसाय, कंटेनर यार्ड्स आणि बंदर यामुळे हजारो रहिवासी हे दररोज येजा करीत आहेत. यामुळे, उरण परिसरातील फ्लोटिंग लोकसंख्या वाढली असून गेल्या काही महिन्यांपासून गुन्हेगारीमध्ये देखील वाढ झाली असून हत्या आणि चोरीच्या गुन्ह्यांमध्ये वाढ झाली आहे.

दरम्यान, उरण शहरातील बाजारपेठ ही तालुक्यातील व्यावसायिक आणि रहिवाशांसाठी मुख्य बाजारपेठ असल्याने दररोज हजारो रहिवासी हे बाजारहाटासाठी येत असतात. त्यातच, शहरातील मुख्य बाजारपेठ असलेल्या रस्त्यांवरील सीसीटीव्ही हे गेल्या अनेक महिन्यांपासून नादुरुस्त असल्याने 'तिसरा डोळा' बंद झाला होता. तसेच, गेल्या वर्षभरापूर्वी उरण शहर आणि परिसरात सीसीटीव्ही बसविण्याचा प्रस्ताव पोलीसांकडून देण्यात आला होता.

उरण शहरातील बंद सीसीटीव्ही सुरू करून शहरातील हालचालीवर नियंत्रण ठेण्यासाठी कक्ष उभारण्यात आला असून याची लवकरच अंमलबजावणी करण्यात येणार त्याची कार्यवाही सुरू असल्याची माहीती उरण पोकुसना दिली आहे.

**तातडीने कार्यवाहीची मागणी**

महिलांच्या सुरक्षिततेसाठी बाजारपेठेतील गर्दीच्या ठिकाणी आणि शहराचे प्रवेशद्वार असलेल्या चारफाटा येथे तसेच, उरण शहरातील शाळांच्या बाहेर फिरणाऱ्या रोडरोमियोवर पोलिसांनी कारवाई करण्याची मागणी पालकांकडून करण्यात येत आहे. यामुळे, उरण शहरातील बाजारपेठ, बाग आणि रेल्वे स्थानक परिसरातील सीसीटीव्ही तातडीने सुरू करण्याची मागणी रहिवाशांकडून करण्यात आली आहे.

# ट्रेलर, ट्रकच्या रांगामुळे प्रवाशांसह नागरिकांचा जीव धोक्यात

**मोहोपाडा : प्रतिनिधी**



पळस्पेफाटा ते कोन मार्गावरील कंटेनर फ्रेट स्टेशन (CFS) आणि लॉजिस्टिक यार्डमुळे होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे हजारो प्रवासी व स्थानिक ग्रामस्थ गेल्या अनेक वर्षांपासून त्रस्त आहेत. दळणवळण, वाहतूक व व्यवसायासाठी आवश्यक असलेल्या सुरक्षिततेच्या नियमांचे सर्रास उल्लंघन होत असल्याचे चित्र पुन्हा एकदा समोर आले आहे.

लॉजिस्टिक यार्डमध्ये जाणाऱ्या शेकडो ट्रेलर, ट्रक यांनी मुख्य रस्त्यापासून थेट उड्डाण पुलावर धोकादायक पद्धतीने पार्किंग केल्याचे निदर्शनास येत आहे. या प्रकारामुळे वाहतुकीचा खोळंबा होऊन प्रवाशांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. यामुळे स्थानिक ग्रामस्थांच्या सुरक्षिततेलाही मोठा धोका निर्माण झाला आहे. CFS नियमांचे उल्लंघन करणाऱ्या बेजबाबदार लॉजिस्टिक यार्डमुळे दररोज होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. या गंभीर घटनेची महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या मार्गदर्शनाखाली खालापूर तालुका सदस्य साबीर शेख यांनी स्वतः दखल घेत लॉजिस्टिक पार्क विभागाशी संपर्क साधला. संबंधित ठिकाणी ट्रेलरचालकांना सूचना देत वाहतूक नियंत्रणाच्या दृष्टीने वाहतूक पोलीस व संबंधित CFS नियंत्रण विभागास हि माहिती देण्यात आली.

या प्रकारावर तातडीने अंकुश आणण्यासाठी व उपयोजना होण्यासाठी सूचना केल्या.

वाहतूक पोलीस व CFS नियंत्रण विभागाने लॉजिस्टिक यार्डची पार्किंग क्षमता व नियमांची काटेकोर तपासणी करावी, वर्क ऑर्डर किंवा व्यावसायिक परवाने देताना कठोर अटी व शर्ती लागू कराव्यात, यार्डमध्ये पार्किंग, शौचालय, सांडपाणी व्यवस्थापन यांसारख्या मूलभूत सुविधा नसल्यास संबंधित उद्योग परवाने कायमस्वरूपी रद्द करावेत, अशी ठोस मागणी वजा सूचना हि करण्यात आली आहे.

यार्ड व्यवस्थापनाने या घटनेची तातडीने दखल घेतल्याचे दिसून आले असले, तरी भविष्यात उड्डाण पुलावर ओव्हरलोड व बेकायदेशीर ट्रक पार्किंगमुळे गंभीर अपघात होण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासन कोणत्या ठोस उपाययोजना करणार, याकडे नागरिकांचे लक्ष लागून राहीले आहे.

## लिव्ह-इन जोडीदाराचा महिलेसह मुलीवर हल्ला

**पनवेल : वार्ताहर**


लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये राहणाऱ्या एका व्यक्तीने चारित्र्याच्या संशयातून जोडीदार महिलेसह तिच्या मुलीवर चाकूने सपासप वार करून दोघींना जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याची घटना पनवेलच्या आदई गावात घडली. या घटनेनंतर खांदेश्वर पोलिसांनी आरोपी रितेश सिंगविरोधात विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

रितेश सिंग हा गेल्या चार वर्षांपासून सोनम जांगीड (वय ४२) या महिलेसोबत लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये पनवेलमधील आदई गाव येथील गायत्री इंद्रप्रस्थ इमारत राहत होता. रितेश सिंग याला सोनमच्या चारित्र्यावर संशय घेत होता. त्यातून त्याने दोघी झोपल्या असताना त्यांच्यावर चाकून वार करुन त्यांना जखमी करून स्वतःला जखमी केले.



**मोहोपाडा : जिल्हा परिषदेच्या तुराडे येथील शाळेत शिक्षकांच्या मागणीनुसार विद्यार्थ्यांना रोटरी क्लब ऑफ पाताळगंगामार्फत व गणेश वर्तक यांच्या सौजन्याने ४३ इंच टीव्ही संच देण्यात आला आहे. या वेळी रोटरी क्लब ऑफ पाताळगंगाचे अध्यक्ष विजय पाटील, माजी अध्यक्ष गणेश काळे, भावी अध्यक्ष देवेंद्र महिंद्रकर, शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवर्ग आणि विद्यार्थी उपस्थित होते.**

## टिळक स्पोर्ट्स कॉप्लेक्समध्ये संजू राठोडची संगीत मैफल



**नवी मुंबई : बातमीदार**

सीवूड्स येथील टिळक एस. के. कॉलेजच्या तत्व - साउंड वेव्ह ते सोल वेव्ह या आठवडाभर चाललेल्या वार्षिक महोत्सवाचा समारोप टिळक स्पोर्ट्सप्लेक्समध्ये भव्य संगीत संध्येनं झाला. पाच हजारांहून अधिक प्रेक्षकांनी उत्साहात रंगलेल्या या कार्यक्रमात कलश म्यूझिकच्या सादरीकरणाने सुरुवात झाली. त्यानंतर रॅप कलाकार मुझामिल आणि फरार यांनी प्रभावी परफॉर्मन्स देत वातावरण तापवले.

टायगरपॉपच्या पॉप-डान्सने आणि नवदीप बसरा यांच्या दमदार सादरीकरणाने कार्यक्रमात आणखी रंग भरला.

समारोपाचा मुख्य आकर्षण ठरला लोकप्रिय गायक संजु राठोड यांचा लाईव्ह परफॉर्मन्स. त्यांच्या चार्टबस्टर गाण्यांनी आणि उत्स्फूर्त संवादाने सभागृहात जल्लोषाची लहर उसळली. विद्यार्थ्यांसह उपस्थितांसाठी ही संध्याकाळ अविस्मरणीय ठरली.

या उत्सवाने विद्यार्थी प्रतिभेला व्यासपीठ देत, सांस्कृतिक अभिव्यक्ती आणि सर्जनशीलतेला प्रोत्साहन देण्याच्या महाविद्यालयाच्या ध्येयाची पुन्हा एकदा जाणीव करून दिली.

## महात्मा फुले महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय ई-चर्चासत्र

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे, महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय पनवेल मधील अर्थशास्त्र विभाग आणि आयक्युएसी यांच्या संयुक्त विद्यमाने २४ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता ट्रान्सफॉर्मिंग इंडियन एग्रीकल्चर टू वर्ड्स आत्मनिर्भर भारत टेक्नॉलॉजी इनोव्हेशन अँड आर्टिफिशियल इंटेलिजन्स या विषयावर आधारित एकदिवशीय आंतराष्ट्रीय ई-चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते.

या ई-चर्चासत्रासाठी बीजभाषक म्हणून डॉ. बद्री नारायणन गोपाळकृष्णनन (अर्थतज्ञ, वॉशिंग्टन युनिव्हर्सिटी, यू.एस.ए) व मार्गदर्शक म्हणून सुनील मदन (सल्लागार, जागतिक बँक वॉशिंग्टन, डी.सी, यू.एस.ए.) तसेच संशोधन पेपर सादरीकरण सत्राचे चे प्रमुख म्हणून प्रोफेसर डॉ. सुरेश मैंद यांना निमंत्रित केले होते.



या चर्चासत्राचे बीजभाषक डॉ. बद्री नारायणन यांनी आपल्या बीज भाषणामध्ये आत्मनिर्भर भारताचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी भारतामध्ये कृषी क्षेत्रामध्ये एआय तसेच तंत्रज्ञानाच्या वापरासह अमुलाग्र बदलाची गरज आहे सांगितले. तर प्रमुख मार्गदर्शक सुनील मदन यांनी जागतिक स्पर्धे ला तोंड देण्यासाठी भारतासारख्या विकसनशील देशांमध्ये कृषी क्षेत्रामध्ये नाविन्य सह बदल होणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले.

प्रोफेसर डॉ.सुरेश मैंद यांनी देखील आत्मनिर्भर भारताचे स्वप्न पूर्ण करण्यामध्ये भारतातील कृषी क्षेत्र नक्कीच महत्त्वाची भूमिका यापुढे बजावेल असा विश्वास व्यक्त केला. या चर्चासत्राची सुरुवात प्रास्ताविक करून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गणेश ठाकूर यांनी केली.प्रस्ताविकेच्या माध्यमातून त्यांनी चर्चा सत्रासाठी उपस्थित असलेले बीजभाषक व मार्गदर्शक तसेच संशोधन पेपर सादरीकरण सत्राचे चे प्रमुख यांचे स्वागत केले. आंतरराष्ट्रीय ई- चर्चासत्राचे महत्त्व सांगताना त्यांनी आत्मनिर्भर भारतासाठी कृषी क्षेत्रामध्ये एआय तंत्रज्ञान यांचे किती महत्त्व आहे हेदेखील थोडक्यात समजावून सांगितले.

चर्चासत्रामध्ये उपस्थित असलेले बीजभाषक डॉ. बद्री नारायणन गोपाळकृष्णनन यांची ओळख अर्थशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख कॅप्टन रामदास जमणुके यांनी केली तर प्रमुख मार्गदर्शक मा.सुनील मदन यांची ओळख अर्थशास्त्र विभागांमध्ये कार्यरत असणारे डॉ. यशवंत उलवेकर यांनी केली. चर्चासत्राचे आभार प्रदर्शन समन्वयक प्रा. सोपान गोवे यांनी केले. चर्चासत्राचे निवेदन डॉक्टर लीना मेश्राम व प्राध्यापिका नंदिनी गायकवाड यांनी केले उपप्राचार्य डॉ. राजाराम पाटील व डॉ. लक्ष्मण गवळी यांचेही मोलाचे सहकार्य लाभले. तर तांत्रिक सहाय्यक म्हणून प्रा.रवींद्र मोरबेकर, प्रा. प्रशांत पाटील ,डॉ. प्रफुल्ल वशेनिकर व डॉ. लक्ष्मन राठोड यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

या एकदिवशीय ई-चर्चासत्रामध्ये तीनशेहुन अधिक व भारतातील १८ राज्यातून संशोधकांनी आपला सहभाग नोंदविला होता. या चर्चासत्रासाठी साठी संशोधक म्हणून संशोधकांनी पाठवलेले संशोधन पेपर आंतरराष्ट्रीय नामांकित रिसर्च जनरलमध्ये प्रकाशित करण्यात येणार आहेत.



## श्री महागणपती मंदिराच्या प्रांगणाचे डांबरीकरण

**उरण :** तालुक्यातील चिरनेर ग्रामपंचायत व पी.पी. खारपाटील कंट्रक्शन अँड कंपनीच्या माध्यमातून, येथील प्रसिद्ध श्री महागणपतीच्या मंदिराच्या प्रांगणाचे डांबरीकरण व मजबुतीकरणाच्या कामाचा शुभारंभ शनिवारी (दि. २७) करण्यात आला.

चिरनेरचे उद्योगपती पी.पी. खारपाटील यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात श्री महागणपती मंदिराच्या प्रांगणाचे डांबरीकरण व मजबुतीकरण करण्याच्या कामाचे आश्वासन उद्योगपती पी.पी. खारपाटील यांनी दिले होते. त्या अनुषंगाने चिरनेर ग्रामपंचायत व पी.पी. खारपाटील कंट्रक्शन अँड कंपनीच्या माध्यमातून या नियोजित कामाला सुरुवात करण्यात आली आहे.

# निवडणूक प्रक्रियेतील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेची निवडणूक पारदर्शक, निष्पक्ष व सुरळीतपणे पार पाडावी यासाठी निवडणूक प्रक्रियेत सहभागी असलेल्या सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांना आवश्यक प्रशिक्षण देण्यात येणार आहे, पनवेल महानगरपालिकेतील २० प्रभागनिहाय क्षेत्राकरीता ६६० मतदान केंद्र आहे. सदर केंद्राकरीता ६ निवडणूक निर्णय अधिकारी (RO), ६८ क्षेत्रीय अधिकारी (ZO) तसेच मतदान केंद्राध्यक्ष (PRO), सहाय्यक मतदान अधिकारी (PO-१,२,३) शिपाई आणि ६५ राखीव मतदान केंद्राकरीता सुसज्ज असे एकूण ७२५ पथके गठीत करण्यात आले आहे.

पनवेल महानगरपालिका निवडणूक प्रक्रियेत सहभागी अशा एकूण ४२०५ अधिकरी व कर्मचाऱ्यांकरीता २९ डिसेंबर ते ३१ डिसेंबर दरम्यान आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल या ठिकाणी प्रशिक्षण सत्रांचे आयोजन करण्यात आले आहे. या कालावधीत विविध टप्यांमध्ये प्रशिक्षण राबविले जाणार आहे.

प्रशिक्षणामध्ये निवडणूक प्रक्रियेतील जबाबदाऱ्या, आचारसंहिता, मतदान व मतमोजणी प्रक्रिया, कायदेशीरबाबी, ई.व्ही.एम. मशीन प्रत्यक्ष हाताळणी तसेच आपत्कालीन परिस्थितीत करावयाची कार्यवाही याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. निवडणूक प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश म्हणजे कोणतीही त्रुटी, गोंधळ किंवा गैरप्रकार टाळून निवडणूक प्रक्रिया विश्वासार्ह व पारदर्शक ठेवणे हा आहे.

प्रशिक्षणाची तारीख, वेळ व ठिकाण याची माहिती संबंधित सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना स्वतंत्रपणे कळविण्यात आली आहे. सदर प्रशक्षिणाकरीता पनवेल महानगरपालिकेमार्फत सर्व पूर्व तयारी करण्यात आलेली आहे. या प्रशिक्षणास उपस्थित राहणे अधिकारी, कर्मचारी यांना बंधनकारक आहे. प्रशिक्षणात अनुपस्थित राहणाऱ्या किंवा आदेशांचे पालन न करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांविरोधात राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार फौजदारी कारवाई करण्यात येईल, असा सक्त इशारा निवडणूक अधिकारी तथा पनवेल मनपा आयुक्त मंगेश चितळे यांच्या वतीने देण्यात आला आहे.

## सातारा साहित्य संमेलनासाठी प्रा. झुंजार माने यांची निवड



**उरण : रामप्रहर वृत्त**

सातारा येथे होणाऱ्या ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात कविता सादरीकरणासाठी तु.ह. वाजेकर ज्यूनियर कॉलेज, फुंडे येथील प्रा. झुंजार माने यांची निवड झाली असून त्याचे सादरीकरण जानेवारी २०२६ ला होणार आहे.

झुंजार माने हे फिजिक्स विषयाचे प्राध्यापक असून रयत शिक्षण संस्थेमध्ये कार्यरत आहेत. त्यांचे आज अखेर कोसले भावकुसुमांचे, तरवणी प्राशताना, फोटॉन उमलताना व मोशनल मोटिवेशनल इमोशनल हे चार काव्यसंग्रह प्रकाशित झाले आहेत. त्यांना यापूर्वी राज्यस्तरीय साहित्य पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. त्यांच्या कवितांचे कार्यक्रम सातारा व सांगली आकाशवाणी केंद्रावर प्रसारित झाले आहेत.

महाराष्ट्रातील विविध वृत्तपत्रांमधून लेखन करणारे प्रा. माने हे खानापूर येथील बालसन्मित्र नाट्य मंडळाचे कार्यकर्ते असून त्यांच्या नाटकातील भूमिका गाजल्या आहेत. राज्यस्तरीय प्रश्नमंजुषा, वक्तृत्व स्पर्धा यांचे संयोजन करणारे माने हे उत्कृष्ट वक्ते देखील आहेत. त्यांच्या वक्तृत्वाचे कार्यक्रम रयत शिक्षण संस्थेच्या विविध महाविद्यालयामध्ये यापूर्वी झाले आहेत.

हरहुन्नरी व प्रसन्न व्यक्तिमत्व असणाऱ्या झुंजार माने यांची आधुनिक काळातील सशक्त कवी म्हणून साहित्यिक क्षेत्राने दखल घेतली आहे. त्यांच्या या निवडीबद्दल प्राचार्य बी.बी. साळुंखे व सहकारी प्राध्यापक, शिक्षक बंधू-भगिनी यांनी अभिनंदन केले आहे.

## अल्काइल क्रीडा महोत्सवाची सांगता



**रसायनी : प्रतिनिधी**

अल्काईल अमाइन्स केमिकल्स लिमिटेड यांच्या सौजन्याने विद्यार्थ्यांच्या क्रीडा गुणांना प्रोत्साहन मिळण्याच्या उद्देशाने दर वर्षी अल्काईल क्रीडा महोत्सवाचे आयोजन केले जाते. यंदाही हा क्रीडा महोत्सव २६ आणि २७ डिसेंबरला चावणे येथील माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळेत उत्साहात पार पडला.

स्पर्धेचे उद्घाटनावेळी अल्काईल अमाइन्स चे वरीष्ठ अधिकारी तुषार शिंदे, युनिट एच आर अर्चना माने, सिनियर सी.एस.आर. ऑफिसर सौ निकिता म्हात्रे, सी.एस.आर कन्सल्टंट रवी ओंकार, तसेच चावणे शाळेचे प्राचार्य पद्माकर झिंगे, सहभागी शाळांचे प्राचार्य आणि क्रीडा शिक्षक, कैलास सोनार आदी उपस्थित होते. अल्काईल अमाइन्स तर्फे शुभम वेताळ, संदीप पाटील आणि ओमकार पिंगळे यांनी तसेच चावणे शाळेचे विद्यार्थी आणि शिक्षक यांचे अमोल सहकार्य लाभले. प्रथमोपचाराची जबाबदारी मनीष बेहरा यांनी सांभाळली होती.

विद्यार्थ्यांनी क्रीडा भावनेने स्पर्धेचा आनंद घेतला. कबड्डी, खो खो, लंगडी, डॉज बॉल, रस्सी खेच, गोळा फेक, थाळी फेक, १०० आणि २०० मीटर धावणे अशा विविध मैदानी खेळांनी ही स्पर्धा गाजली. या प्रसंगी चावणे शाळेचेसह शिक्षक श्री वाघ सर यांचा महाराष्ट्र राज्य खो खो टीमचे कॅप्टन झाल्याबद्दल अल्काईल अमाइन्स तर्फे सत्कार करण्यात आला. जिद्द, चिकाटी, एकी यांच्या बळावर विद्यार्थ्यांनी आपले कसब पणाला लाऊन अल्काईल अमाइन्स ने आयोजित केलेल्या स्पर्धांना उचित न्याय दिला. परिसरातील आठ शाळांनी जवळजवळ एक हजार विद्यार्थ्यांनी या स्पर्धा गाजवल्या आणि सर्व स्पर्धात मिळून १२० बक्षिसं पटकावली.

भरघोस बक्षिसं असलेला पारितोषिक वितरण समारंभ अल्काईल च्या युनिट एच आर अर्चना माने, चावणे शाळेचे प्राचार्य पद्माकर झिंगे, श्री एस आर कन्सल्टंट रवी ओंकार, सचिन आंब्रे, तुषार शिंदे, शुभम वेताळ, ओमकार पिंगळे, निलेश बेहरा यांच्या हस्ते पार पडला. चावणे शाळेतील खरे सर, कैलास सोनार आणि त्यांचे सहकारी यांनी या स्पर्धा यशस्वी होण्यासाठी योग्य मार्गदर्शन केले.

# पर्यटन हंगामाला आला बहर!

## मुंबई–गोवा, माणगाव–पुणे महामार्गांवर वाहनांच्या रांगा



**माणगाव : प्रतिनिधी**

नवीन वर्षाच्या स्वागतासाठी कोकण किनारपट्टीकडे जाणाऱ्या पर्यटकांची अभूतपूर्व गर्दी उसळल्याने मुंबई–गोवा राष्ट्रीय महामार्गासह माणगाव–पुणे मार्गावर पुन्हा एकदा भीषण वाहतूक कोंडी निर्माण झाली आहे. थर्टी फर्स्ट, शनिवार–रविवारची सलग सुट्टी आणि हॉटेल्स, होमस्टे हाऊसफुल झाल्यामुळे पहाटेपासूनच महामार्गांवर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या.

मुंबई, पुणे, ठाणे, नवी मुंबईसह पश्चिम महाराष्ट्रातून मोठ्या संख्येने पर्यटक कोकणाकडे दाखल होत आहेत. परिणामी मुंबई–गोवा महामार्गावरील इंदापूर, माणगाव, कोलाड, नागोठणे परिसरात तसेच माणगाव–पुणे मार्गावर अनेक ठिकाणी संथगतीने वाहतूक सुरू असल्याचे चित्र दिसून आले. माणगावपासून मुंबई बाजूकडे व महाड बाजूकडे सुमारे पाच किलोमीटरच्या रांगा लागल्या होत्या, नववर्षाच्या स्वागतासाठी रायगडात पर्यटकांचा महापूर लोटला होता. त्यामुळे महामार्ग जाम झाल्याने खासगी वाहनातील तसेच महामंडळाच्या बसमधील प्रवासी नागरिकांचे पाणी, नाश्ता, जेवण व प्रसादनगृहासाठी प्रचंड हाल झाले.

सकाळपासून लागलेली वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी माणगाव पोलीस, महामार्ग पोलीस व वाहतूक शाखेचे अधिकारी –कर्मचारी दिवसभर रस्त्यावर तैनात होते, मात्र वाहनांची संख्या क्षमतेपेक्षा अनेक पटीने वाढल्याने ही वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी पोलिसांनाही मोठी कसरत करावी लागत आहे. अवजड वाहने, खासगी बस, पर्यटकांच्या चारचाकी गाड्या आणि दुचाकी यांची सरमिसळ यामुळे कोंडीत आणखी भर पडत आहे. पुढील चार दिवस मुंबई–गोवा महामार्गावर वाहतूक ताणातच राहण्याची शक्यता असून प्रवाशांनी प्रवासाचे योग्य नियोजन करावे, पर्यायी मार्गांचा वापर करावा तसेच पोलिसांच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. अन्यथा थर्टी फर्स्टचा आनंद प्रवाशांसाठी वाहतूक कोंडीच्या त्रासातच अडकण्याची शक्यता नाकारता येत नाही.

२५ डिसेंबरच्या ख्रिसमस सुट्टीनंतरही मुंबई–गोवा राष्ट्रीय महामार्गासह माणगाव–पुणे मार्गावरील वाहतूक कोंडी कायम राहिल्याने प्रवाशांचे हाल सुरूच आहेत. ख्रिसमसपासून थर्टी फर्स्ट आणि नववर्ष स्वागताच्या पार्श्वभूमीवर कोकणाकडे जाणाऱ्या पर्यटकांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याने महामार्गांची क्षमता अपुरी पडू लागली आहे. मुंबई, ठाणे, नवी मुंबई, पुणे तसेच पश्चिम महाराष्ट्रातील विविध भागांतून मोठ्या प्रमाणात पर्यटक कोकण किनारपट्टीकडे दाखल होत आहेत. यामुळे इंदापूर, माणगाव, कोलाड, नागोठणे आदी ठिकाणी सातत्याने संथगतीने वाहतूक सुरू असून अनेक वेळा काही किलोमीटरपर्यंत वाहनांच्या रांगा लागत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. ख्रिसमसच्या दिवशी निर्माण झालेली कोंडी अद्याप पूर्णपणे निवळलेली नसून दररोज नव्या वाहनांच्या भरामुळे परिस्थिती अधिकच गंभीर होत आहे.

प्रवासाचा वेळ दुप्पट – तिप्पट वाढला असून प्रवासी प्रचंड मानसिक व शारीरिक त्रास सहन करत आहेत.

### पोलिसांची कसरत

वाहतूक कोंडीवर नियंत्रण मिळवण्यासाठी माणगाव पोलीस, महामार्ग पोलीस आणि वाहतूक शाखेचे अधिकारी–कर्मचारी सतत रस्त्यावर तैनात आहेत, मात्र वाहनांची संख्या अपेक्षेपेक्षा कितीतरी पटीने वाढल्याने पोलिसांनाही मोठ्या प्रमाणावर कसरत करावी लागत आहे. काही ठिकाणी पर्यायी मार्ग खुले करण्यात आले असले तरी पर्यटकांची अखंड ये–जा सुरू असल्याने कोंडी कमी होण्याऐवजी टिकून राहिली आहे.

# माणगावात जिल्हास्तरीय महा पोलीस डेमो भरती





**माणगाव : प्रतिनिधी**

सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात संपूर्ण महाराष्ट्र राज्यात नावलौकिक कमाविलेल्या जिजाऊ शैक्षणिक व सामाजिक संस्था महाराष्ट्र राज्य यांच्या विद्यमाने रायगड व सातारा जिल्हा आयोजित माणगाव येथे अल्ताफदादा धनसे यांच्या भव्य मैदानावर रविवार, २८ डिसेंबर २०२५ रोजी घेण्यात आलेल्या मोफत महा पोलीस डेमो भरती २०२५ला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त असा प्रतिसाद लाभला. या पोलीस डेमो भरतीसाठी रायगड व सातारा जिल्ह्यातील विविध तालुक्यांतील, गावांतील सुमारे ३२०० विध्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला होता.

माणगाव येथे संस्थेचे सर्वेसर्वा तथा शिवसेना उपनेते निलेश सांबरे यांच्या विशेष सहकार्याने जिजाऊ संस्थेच्या वतीने घेण्यात आलेल्या या मोफत

### विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

महा पोलीस डेमो भरती २०२५ चे उदघाटन राज्याचे रोजगार हमी योजनामंत्री भरत गोगावले व जिजाऊ संस्थेचे संस्थापक निलेश सांबरे यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमास शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख प्रमोद घोसाळकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक माणगाव नरेंद्र बेलदार, सहसंपर्कप्रमुख चंद्रकांत कळंबे, राजिपचे माजी सभापती ज्ञानदेव पवार, युवासेना जिल्हाप्रमुख विपुल उभारे, परेश कारंडे, तालुकाप्रमुख ॲड.महेंद्र माणकर, शहरप्रमुख नितीन दसवते, विकास गायकवाड, डॉ.परेश उभारे, केदार चव्हाण, एकनाथ होबले, प्रसाद धारिया, उद्योजक विजय मेथा, रणधीर कनोजे, दिनेश हरवंडकर, सिद्धेश सत्वे, जितेंद्र तेटगुरे, मंगेश कदम, मनोज पवार, प्रवीण बागवे, जिजाऊ संस्थेचे कार्यकर्ते निलेश म्हात्रे, उमेश यादव, वैभव मोरे, मिलिंद शेलार, गौरव करचे आदी मान्यवरांसह रायगड व रत्नागिरी जिल्ह्यातून जिजाऊ संस्थेचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

रत्नागिरी जिल्ह्यानंतर त्यांनी रायगड जिल्यातील माणगाव येथे हा पोलीस डेमो भरतीचा उपक्रम घेतला आहे. या डेमो भरतीत उंच उडी, लांब उडी, धावणे यांसारख्या स्पर्धा घेण्यात येऊन विद्यार्थ्यांना पोलीस भरतीसाठी उत्कृष्ट असे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. माणगाव येथील जिजाऊ संस्थेच्या या पोलीस डेमो भरतीला विद्यार्थ्यांचा प्रचंड उत्साह पहाटेपासूनच ओसांडून वाहत होता.

# छायाचित्र स्पर्धेत दीक्षित कांबळे प्रथम

**अलिबाग : प्रतिनिधी**

इमेज कॅलेंडरतर्फे आयोजित छायाचित्र दीक्षित कांबळे यांना प्रथम क्रमांक मिळाला. वैभव शिंदे यांनी द्विती तर महेंद्र महाडिक यांनी तृतीय क्रमांक मिळवला.

इमेज कॅलेंडर छायाचित्र स्पर्धेचे यंदाचे आठवे वर्ष आहे. यंदाही २०२६च्या वार्षिक कॅलेंडरसाठी रायगड जिल्ह्यातील निसर्गाने नटलेली पुरातन मंदिरे, निसर्ग सौंदर्य, पारंपरिक सण, गड किल्ल्यांच्या छायाचित्रांनाही स्पर्धेत संधी देण्यात आली होती. जिल्ह्यातून सादर झालेल्या शेकडो छायाचित्रांमधून १२ छायाचित्रांची निवड मान्यवर परीक्षकांच्या माध्यमातून करण्यात आली आहे. या स्पर्धेला जिल्ह्यातून शेकडो छायाचित्रकारांचा सहभाग लाभला होता. यामुळे २०२६च्या इमेज कॅलेंडरच्या दिनदर्शिकेमध्ये रायगड जिल्ह्यातील निसर्गाने नटलेली पुरातन मंदिर यांची छबी अवतरलेली पहावयास मिळणार आहे.

स्पर्धेसाठी आलेल्या शेकडो छायाचित्रांमधून कॅलेंडरसाठीच्या बारा पानांसाठी निवड करणे जिकरीचे होते. यासाठी इमेज कॅलेंडर संस्थेने अलिबाग येथील ज्येष्ठ पत्रकार जयंत धुळप यांची निवड केली होती. त्यांच्या परीक्षणानंतर बारा छायाचित्रणाची निवड करण्यात आली आहे.

क्रमांकानुसार कॅलेंडरच्या पहिल्या पानावरुन छायाचित्रकारांची छायाचित्रे प्रसिद्ध करण्यात येणार असल्याची माहिती इमेज कॅलेंडरचे संस्थापक जितू शिगवण, रमेश कांबळे आणि समीर मालोदे यांनी दिली आहे.

स्पर्धेचा निकाल १) दीक्षित कांबळे, महाड, २) वैभव शिंदे, श्रीबाग, ३) महेंद्र महाडिक, अलिबाग, ४) शुभम सुंकले, थळ , ५) डॉ. गणेश गवळी, अलिबाग, ६)निलेश दुदम, गोंधळपाडा, ७) भारत रांजणकर, मुरूड ८) सनीश म्हात्रे, मिळकतखर ९) जयंत ठाकूर, पेण, १०) कल्पेश पाटील, महाड, ११)मोनिका औचटकर, बेलोशी, १२) सुनील ठोकळ, अलिबाग.

# अलिबागच्या पोयनाड नाक्यावर मंगेश काळोखे हत्येचा निषेध



**अलिबाग : प्रतिनिधी**

खोपोलीतील शिवसेनेच्या नवनिर्वाचित नगरसेविका मानसी काळोखे यांचे पती मंगेश काळोखे यांच्या हत्येच्या घटनेचे पडसाद रायगड जिल्ह्यात उमटायला सुरूवात झाली आहेत. या घटनेचा निषेध करण्यासाठी शिवसैनिकांनी अलिबाग तालुक्यातील पोयनाड नाका येथे निदर्शने केली.

शिवसेना जिल्हाप्रमुख राजा केणी यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. या वेळी जोरदार घोषणाबाजी करत हल्लेखोरांचा निषेध करण्यात आला. या वेळी मारेकऱ्यांच्या प्रतिकात्मक पुतळ्याचे दहन करण्यात आले. नगरपालिका निवडणूकीत झालेल्या पराभवामुळे कट रचून मंगेश काळोखे या शिवसैनिकाची हत्या करण्यात आली. या कटाच्या मुख्य सुत्रधाराला अटक होईपर्यंत जिल्हाभरात शिवसैनिकांची आंदोलने सुरूच राहतील, असा इशारा जिल्हाप्रमुख राजा केणी यांनी या वेळी दिला.

शिवसेना युवासेना तालुका प्रमुख संदेश थळे, अलिबाग तालुका संघटक जीवन पाटील, कुर्डुस विभाग प्रमुख स्वप्नील म्हात्रे, युवासेना उपप्रमुख संकेत पाटील, युवासेना उपतालुका प्रमुख निखील तावडे, मापगाव वि भाग प्रमुख जगदीश सावंत, महिला आघाडी उपतालुकाप्रमुख रेश्मा जोशी, महिला आघाडी कुर्डुस विभाग प्रमुख सुकेशिनी पाटील, उपतालुकाप्रमुख विकास निळकर, प्रतिक पाटील यांच्यासह शिवसैनिक मोठया संख्येने आंदोलनात सहभागी झाले होते. दरम्यान, वाहतूक कोंडी होवू नये यासाठी पोलिसांनी खबरदारी घेतली होती.

# कल्याणी हॉस्पिटलमध्ये सोनोग्राफी सेंटर सुरू



**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड शहरातील प्रसिद्ध कल्याणी हॉस्पिटलमध्ये डॉ. राज कल्याणी व लक्ष्मी कल्याणी यांच्या हस्ते सोनोग्राफी सेंटरचे फित उद्घाटन करण्यात आले.

या काय्रक्रमाला डॉ.अभयकुमार बडगिरे, जंजिरा मेडिकलचे अध्यक्ष डॉ.संजय पाटील, प्रसिद्ध डॉ. राज कल्याणी, लक्ष्मी राज कल्याणी, डॉ मकबुल कोकाटे, डॉ. मंगेश पाटील, डॉ.मयुर कल्याणी, डॉ.भाविका कल्याणी, भुमीत कल्याणी, डॉ. हितेश जैन, डॉ. वासिम पेशइमाम, सुनील पटेल, डॉ.रविंद्र नामजोशी, डॉ.अमित बेनकर, डॉ.शकील परदेशी आदिंसह डॉक्टर्स व रुग्ण उपस्थित होते.

या वेळी डॉ.राज कल्याणी यांनी सांगितले की, सोनोग्राफीच्या सुविधे मुळे रुग्णांची गैरसोय होणार नाही. या सोनोग्राफीमुळे गर्भावस्थेतील बाळाची तपासणी, पोटातील अवयवांचे निदान (यकृत, किडनी), आणि इतर ३३ प्रकारच्या सोनोग्राफी होतील डोक्यापासून पायापर्यंत ज्या अवयवां ची सोनोग्राफी होऊ शकते त्या सर्व सोनोग्राफी माइंद्रे कंपनीच्या अद्यावत सोनोग्राफी मशीन मुळे शक्य होणार आहे, असे मत यावेळी डॉ. राज कल्याणी यांनी केले.

# नगराध्यक्ष दांडेकर आज करणार पदग्रहण

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड नगर परिषद निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस व उद्धव बाळासाहेब ठाकरे युतीच्या उमेदवार आराधना मंगेश दांडेकर यांनी २४५ मतांनी विजय प्राप्त केला होता. नवनिर्वाचित नगराध्यक्षा आराधना मंगेश दांडेकर या सोमवारी (दि.२९) पदग्रहण करणार आहेत.

या कार्यक्रमासाठी माजी आमदार व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रमुख नेते अनिकेत तटकरे उपस्थित राहून नवनिर्वाचित नगराध्यक्ष यांना शुभेच्छा देणार आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष व माजी नगराध्यक्ष मंगेश दांडेकर यांनी सांगितले की, मुरूड शहरातील नागरिकांनी चोखंदळ पणे मतदान करून थेट नगराध्यक्षपदी आराधना दांडेकर यांना मोठ्या मताधिक्याने विजयी केले. मुरुड शहरातील नागरिकांचा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सदैव ऋणी राहील. नागरिकांनी आमच्या बाजूने कौल दिल्यामुळेच आम्ही सत्तास्थानी बसलो आहोत.

# रोहा शहरात भाजप नगरसेवक रोशन चाफेकरांच्या कार्याला सुरुवात



**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा शहरात तब्बल २४ वर्षांनंतर भारतीय जनता पक्षाचा नगरसेवक नगरपरिषदेवर निवडून आल्याने शहरात आणि तालुक्यात राजकीय चर्चांना वेग आला आहे. या ऐतिहासिक विजयातून प्रभाग क्रमांक ९ मधून रोशन चाफेकर नगरसेवक म्हणून निवडून आल्यानंतर त्यांनी तत्काळ कामाला सुरुवात केली आहे.

प्रभाग क्रमांक ९ मधील जनतेच्या विश्वासावर निवडून आलेले नगरसेवक रोशन चाफेकर यांनी प्रभागात प्रत्यक्ष फेरफटका मारत नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या. या वेळी धनलक्ष्मी बिल्डिंग परिसरातील गटाराच्या समस्येकडे त्यांनी आपुलकीने लक्ष देत संबंधित यंत्रणेशी चर्चा करून तातडीच्या उपाययोजनांचे निर्देश दिले.

निवडणूक संपल्यानंतरही जनतेच्या गाठीभेटी सुरू असतानाच, आता जबाबदारी अधिक वाढली आहे, ही भावना त्यांच्या प्रत्येक कृतीतून दिसून येत आहे. नागरिकांच्या अडचणी ह्याच आपली जबाबदारी मानत, शब्दांपेक्षा कृतीवर विश्वास ठेवणारा नगरसेवक अशी त्यांची ओळख प्रभागात निर्माण होत आहे.

या वेळी बोलताना नगरसेवक रोशन चाफेकर म्हणाले, प्रभागातील प्रत्येक लहान–मोठ्या कामाचा दर महिन्याच्या शेवटी एकत्रित आढावा नागरिकांसमोर मांडण्याचा माझा प्रयत्न राहील.

# श्री चंडिका ग्रामदेवी पुन:दर्शन सोहळा



**तळा : प्रतिनिधी**

तळ्याची ग्रामदेवता श्री चंडिका देवी पुन:दर्शन सोहळा २ व ३ जानेवारी २०२६ रोजी श्री चंडिकामाता मंदिर तळा येथे विविध आध्यात्मिक कार्यक्रमांनी साजरा करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचे यजमानपद राणेंची वाडी (गोळे आळी) यांच्याकडे आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाला निमंत्रण देण्यात आले होते.

नवसाला पावणारी म्हणून प्रसिद्धीस येत असलेल्या श्री चंडिका देवी पुनः दर्शन सोहळा २ जानेवारी वार शुक्रवार रोजी सकाळी १० ते १ पालखी मिरवणूक, दुपारी ३ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत हळदीकुंकू समारंभ, रात्री ७ ते ८ धुपारती – पंचपदी, रात्री ९ ते ११ श्री.ह.भ.प.महंत बबनराव महाराज खेडकर यांचे कीर्तन, रात्री ११ वा भजन यजमान ग्रामस्थ व महिला मंडळ राणेचीवाडी (गोळे आळी) व दुसऱ्या दिवशी ३ जानेवारी वार शनिवार रोजी सकाळी ४.३० ते ६.३० काकड आरती, सकाळी ६.३० ते १०.३० श्री चंडिका ग्रामदेवी अभिषेक व श्री चंडिकादेवी षोडशोपचार पूजा, श्रीगणेश पूजा, नवग्रह होम हवन, सकाळी ११.३० वा.बारा वाड्यांच्या दिड्यांचे आगमन नंतर महाआरती व मंत्रपुष्पांजली व दुपारी महाप्रसाद रात्री ९ ते १२ सांस्कृतिक कार्यक्रम व भजन असे विविध कार्यक्रम होणार असून मोठा देवीचा पुनःदर्शन कार्यक्रम होणार आहे.

या कार्यक्रमाला सर्व भाविकांनी दर्शनाचा लाभ घ्यावा, असे सूचित करण्यात आले आहे. या दोन दिवसीय सोहळ्यास भाविक मोठ्या संख्येने दर्शनासाठी येत असतात. तालुक्यातील मुंबईकर मंडळी, इतर ठिकाणी असलेली मंडळी या दिवसात दर्शन घेऊन जात असतात. त्याचबरोबर महाराष्ट्रातून अनेक भक्तगण तसेच राजकीय नेतेही नवसाला पावणाऱ्या श्री चंडिका देवीचे दर्शन घेत असतात.

# भारतीय बौद्ध महासभा रोहातर्फे महिला मुक्ती दिन



**रोहा : प्रतिनिधी**

२५ डिसेंबर १९२७ रोजी महाड येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी मनुस्मृती या ग्रंथाचे सामूहिक पद्धतीने सार्वजनिक जाहीर दहन करून शतकानुशतके समाजमनावर बसलेली अन्याय, अत्याचाराची जखड या कुत्यातून उघडपणे तोडली. स्त्रीला गुलाम बनवण्याची संपूर्ण व्यवस्था, अमानवी अत्याचाराचे लिखित समर्थन ग्रंथाने जातीव्यवस्था, स्त्रीशोषण, कठोर, दडांत्तक स्वरूप असलेल्या मनुस्मृती ग्रंथाच्या जाहीर दहनाने स्त्री मुक्त झाली.

म्हणून या दिवसाला स्त्री मुक्ती दिन म्हणतात व संपूर्ण देशात विविध संस्थांच्यावतीने कार्यक्रम आयोजित केले जातात. दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया तथा भारतीय बौद्ध महासभा रोहा तालुक्याच्यावतीने दरवर्षी महिला विभागाच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. याही वर्षी गुरुवारी (२५ डिसेंबर २०२५) रोजी ज्येष्ठ नागरिक सभागृह रोहा महिला विभाग अध्यक्षा प्रतिभा शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी प्रमुख मार्गदर्शक मुंबई येथून केंद्रीय शिक्षका, बौद्धाचार्य, महाराष्ट्र राज्य महिला संस्कार विभाग सचिव संपदा संतोष चव्हाण यांनी अभ्यास पूर्ण मार्गदर्शन उपस्थितांना केले.

या वेळी केंद्रीय शिक्षका सुमती मोरे, अश्विनी मोरे, मिरा सुरळकर, सपना साळवी, राजश्री जाधव, केंद्रीय शिक्षक मा.जिल्हा सरचिटणीस शांतीशिल तांबे यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात प्रास्ताविक संस्कार उपाध्यक्षा शर्मिलाताई तांबे यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन महिला सचिव जानवीताई तांबे यांनी केले.

कार्यक्रमासाठी महिला विभाग पदाधिकारी कांचन जाधव, विमल जाधव, प्रणिता माने, लिला यादव, शोभा भोसले, वनिता शिंदे,दिव्या शिंदे, नंदा वाटवे, सुनंदा शिंदे, अंकिता शिंदे, साधना कांबळे, अक्षदा वाघमारे, भाग्यश्री आयनोडकर, निशा उंदरे, अपर्णा तुळवे, ज्योत्स्ना वाघमारे, मनिषा गायकवाड व इतर सर्व महिला भगिनी यांनी मदत केली. त्यांना तालुका अध्यक्ष रवींद्र आयनोडकर, सरचिटणीस दिपक शिंदे, कोषाध्यक्ष राजेश जाधव, तुळशीराम शिंदे, भागुराम शिंदे, मनोहर शिंदे, केशव उंदरे, बबन भोसले, उत्तम इंगोले, हेमंत तांबे, रामदास सुरळकर, संतोष साळवी व इतर जिल्हा पदाधिकारी तालुका पदाधिकारी केंद्रीय शिक्षक, बौद्धाचार्य, श्रामणेर, उपासक, उपाशिका सभासद यांनी उपस्थित राहून सहकार्य केले. आभार तालुका कोषाध्यक्षा लताताई कांबळे यांनी मानले.

# अंडर १९ वर्ल्डकपसाठी टीम इंडियाची घोषणा

## आयुष म्हात्रेकडे नेतृत्व

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) आगामी अंडर १९ वर्ल्डकप स्पर्धेसाठी संघाची घोषणा केली आहे. अंडर १९ आशिया कप स्पर्धेतील फायनलमधील पराभवानंतरही आयसीसीच्या स्पर्धेसाठी बीसीसीआयने सेम पॅटर्नसह १५ सदस्यीय संघाची निवड केली आहे.

आयुष म्हात्रेच्या नेतृत्वावर भरवसा कायम ठेवला असून उपकर्णधारपदाची जबाबदारी ही विहान मल्होत्राकडे सोपवण्यात आली आहे, पण दुखापतीमुळे हे दोघेही अंडर १९ वर्ल्डकप स्पधआधी रंगणाऱ्या दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या वनडे मालिकेला मुकणार आहेत, अशी माहितीही बीसीसीआयने दिली.



झिम्बाब्वे आणि नामिबीया यांच्या संयुक्त यजमानपदाखाली होणाऱ्या अंडर–१९ वर्ल्डकप स्पर्धेत एकूण १६ संघांचा सहभाग आहे. या संघांची चार गटांमध्ये विभागणी करण्यात आली आहे. साखळी फेरी, सुपर सिक्स फेरी, उपांत्य फेरी आणि अंतिम सामना अशा पद्धतीने १५ जानेवारी ते ६ फेब्रुवारी या कालावधीत ही स्पर्धा खेळवली जाईल. युवा भारतीय संघाने आतापर्यंत २०००, २००८, २०१२, २०१८, २०२२ अशा पाच वेळा जेतेपद पटकावले असून भारतीय संघ 'ब' गटात न्यूझीलंड, अमेरिका आणि बांगलादेश या संघासोबत खेळताना दिसेल.

भारतीय संघ १५ जानेवारीला अमेरिकेविरुद्धच्या लढतीने वर्ल्डकप स्पर्धेच्या मोहिमेला सुरुवात करेल. त्यानंतर साखळी फेरीतील दुसऱ्या सामन्यात भारतीय संघ १७ जानेवारीला बांगलादेशविरुद्ध आणि २४ जानेवारीला न्यूझीलंडविरुद्ध खेळताना दिसेल. हे सर्व सामने बुलवायो येथील क्वीन्स स्पोर्ट्स क्लबच्या मैदानात नियोजित आहेत.

संघ : आयुष म्हात्रे (कर्णधार), विहान मल्होत्रा (उपकर्णधार), वैभव सूर्यवंशी, एरोन जॉर्ज, वेदांत त्रिवेदी, अभिज्ञान कुंडू (यष्टीरक्षक), हरवंश सिंग (यष्टीरक्षक), आर. एस. अंब्रिश, कनिष्क चौहान, खिलान ए. पटेल, मोहम्मद इनान, हेनिल पटेल, डी. दीपेश, किशन कुमार सिंग, उधव मोहन.

## कुमार गट राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा आजपासून

**मुंबई : प्रतिनिधी**

अमर हिंद मंडळाच्या वतीने महाराष्ट्र राज्य व मुंबई शहर कबड्डी असोसिएशच्या मान्यतेने राज्यस्तरीय कुमार गट कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. दादर येथील अमर हिंद मंडळाच्या पटांगणावर २९ डिसेंबर ते २ जानेवारी या कालावधीत होणाऱ्या या स्पर्धेत मुंबई शहरचे १०, मुंबई उपनगरचे तीन, ठाणे व पालघरचे प्रत्येकी दोन, तर रत्नागिरीचा एक अशा १८ नामवंत संघाना सहभाग देण्यात आला आहे.

सामने सायंकाळच्या सत्रात प्रखर विद्युतझोतात एका मॅटच्या क्रीडागणांवर खेळविली जातील. विजेत्या संघास स्व. उमेश शेनॉय चषक व रोख ३० हजार रुपये, उपविजेत्या संघास चषक व रोख २० हजार रु. प्रदान करण्यात येतील. उपांत्य उपविजयी दोन्ही संघांना प्रत्येकी चषक व रोख १० हजार रु. देऊन गौरविण्यात येईल. स्पर्धेत सर्वोत्तम ठरणाऱ्या खेळाडूस तसेच उत्कृष्ट चढाई व पकडीच्या खेळाडूस प्रत्येकी सायकल देऊन सन्मानित करण्यात येईल. त्याचबरोबर प्रतिदिनी मानकरी ठरणाऱ्या खेळाडूस स्मार्ट वॉच देऊन गौरविण्यात येईल.

## दक्षिण आफ्रिकेविरुद्ध वनडे मालिकेसाठी वैभव सूर्यवंशीकडे धुरा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताचा युवा स्फोटक सलामीवीर वैभव सूर्यवंशी हा क्रिकेटच्या मैदानातील आपल्या दमदार कामगिरीमुळे सातत्याने चर्चेत आहे. वयाच्या अवघ्या १४व्या वर्षी आयपीएलमध्ये विक्रमी शतकी खेळीनंतर तो प्रत्येक स्पर्धा गाजवताना दिसला. कमी वयात फलंदाजीतील कर्तृत्व सिद्ध केल्यावर आता अंडर १९ वर्ल्डकप स्पर्धेआधी बीसीसीआयने त्याला थेट अंडर १९ टीम इंडियाच्या कॅप्टन्सीची जबाबदारी सोपवली आहे.



भारतीय अंडर १९ संघ आगामी वर्ल्डकप स्पर्धेआधी दक्षिण आफ्रिकेविरुद्ध तीन सामन्यांची वनडे मालिका खेळणार आहे. या मालिकेत युवा भारतीय संघाचे नेतृत्व हे वैभव सूर्यवंशीकडे सोपवण्यात येणार आहे. बीसीसीआयने त्याला कॅप्टन करताच त्याच्या नावे आणखी एका विक्रमाची नोंद झाली आहे. तो अंडर १९मध्ये संघाचे नेतृत्व करणारा सर्वात युवा कर्णधार झाला आहे. नव्या वर्षात नाणेफेकीसाठी मैदानात उतरताच त्याच्या नावे या नव्या विक्रमाची नोंद होईल.

अंडर १९ संघाचा नियमित कर्णधार आयुष म्हात्रे आणि उपकर्णधार विहान मल्होत्रा दोघेही दुखापतीमुळे अंडर १९ वर्ल्डकप स्पर्धेआधी दक्षिण आफ्रिकेविरुद्ध होणाऱ्या युथ वनडे मालिकेला मुकणार आहेत. त्यांच्या अनुपस्थितीत भारतीय संघाचे नेतृत्व हे १४ वर्षीय वैभव सूर्यवंशीकडे सोपवण्यात आले आहे, तर एरोन जॉर्ज याच्याकडे उप कर्णधारपदाची जबाबदारी देण्यात आली आली आहे.

संघ : वैभव सूर्यवंशी (कर्णधार), उपकर्णधार (एरोन जॉर्ज), वेदांत त्रिवेदी, अभिज्ञान कुंडू (यष्टीरक्षक), हरवंश सिंग (यष्टीरक्षक), आर. एस. अंब्रिश, कनिष्क चौहान, खिलान ए. पटेल, मोहम्मद इनान, हेनिल पटेल, डी. दीपेश, किशन कुमार सिंग, उधव मोहन, युवराज गोहिल, राहुल कुमार.

**मालिकेचे वेळापत्रक**

- **३ जानेवारी** : पहिली वनडे
- **५ जानेवारी** : दुसरी वनडे
- **७ जानेवारी** : तिसरी वनडे

(तिन्ही सामने विलोमूर पार्क येथे होतील)

## इटलीच्या बॅटरकडून शाहीन आफ्रिदीची धुलाई

**सिडनी : वृत्तसंस्था**

ऑस्ट्रेलियामध्ये सुरू असलेल्या टी–२० लीग बिग बॅश लीग स्पर्धेत सध्या चुरशीचे सामने पहायला मिळत आहेत. या हंगामात पाकिस्तानचा कर्णधार आणि स्टार जलदगती गोलंदाज शाहीन आफ्रिदी ब्रिस्बेन हीट संघाचे प्रतिनिधीत्व करत आहे. २७ डिसेंबर रोजी ब्रिस्बेनच्या गाबा मैदानावर ब्रिस्बेन हीट आणि ॲडलेड स्ट्रायकर्स यांच्यात सामना खेळवण्यात आला. ॲडलेड स्ट्रायकर्सविरुद्धच्या सामन्यात इटालियन खेळाडूने आफ्रिदीची धुलाई केली. या षटकानंतर पाकिस्तानी गोलंदाजावर लंगडत लंगडत मैदान सोडण्याची वेळ आली.



या सामन्यात इटलीचा खेळाडू हॅरी मॅनेंटी याने शाहीन आफ्रिदीची चांगलीच धुलाई केली. एका षटकात मॅनेंटीने सलग तीन चौकार ठोकत शाहीन आफ्रिदीच्या गोलंदाजीवर अक्षरश: तुटून पडल्याचे पहायला मिळाले. ब्रिस्बेन हीटने हा सामना अवघ्या सात धावांनी जिंकला, पण या सामन्यात आफ्रिदीला काही जलवा दाखवता आला नाही. इटलीच्या गोलंदाजाकडून धुलाई झाल्याचा मुद्दा सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरत आहेत. त्यात षटक पूर्ण केल्यावर त्याने मैदानही सोडले. खरंच तो दुखापतीने त्रस्त होता की, इटलीच्या बॅटरने धुलाई केल्यामुळे त्याने नौटंकी केली हादेखील मुद्दा चर्चेचा ठरताना दिसते.

या सामन्यात शाहीन आफ्रिदीने पहिल्या दोन षटकात फक्त सात धावा दिल्या होत्या. १२व्या षटकात तो पुन्हा गोलंदाजीला आला, पण या षटकात त्याने १९ धाव खर्च केल्या. षटक टाकून झाल्यावर फिल्डिंग करताना तो लंगडताना दिसले. एवढेच नाही तर त्याने लंगडत लंगडतच मैदान सोडले.

आफ्रिदीने तीन षटकात २६ धावा खर्च केल्या. बीबीएलच्या पदार्पणातील सामन्यात आफ्रिदी महागडा ठरला होता. २.४ षटकांत एकही विकेट न घेता त्याने ४३ धावा खर्च केल्या होत्या. त्यात आता आणखी एका महागड्या षटकाची भर पडली आहे. आतापर्यंत बीबीएलच्या या हंगामात पाकिस्तानी गोलंदाजाने चार सामने खेळले असून केवळ दोन विकेट्स घेतल्या आहेत.

## जागतिक जलद बुद्धिबळ स्पर्धेत गुकेश, एरिगेसीला संधी

**दोहा : वृत्तसंस्था**

भारताचा पारंपरिक प्रारूपातील जगज्जेता दोम्माराजू गुकेश आणि अर्जुन एरिगेसी हे दोघेही भारतीय खेळाडू जागतिक जलद (रॅपिड) बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेच्या नऊ फेऱ्यांनंतर चांगली स्थितीत पोहचले आहेत. हे दोन्ही खेळाडूंचे ६.५ गुण असून ते संयुक्त तिसऱ्या स्थानी आहेत.





ग्रँडमास्टर व्लादिस्लाव आर्तेमिएव आणि हान्स निमन हे दोघेही ७.५ गुणांसह अग्रस्थानी आहेत, तर पाच जेतेपद मिळवणारा मॅग्नस कार्लसनची सात गुणांसह संयुक्त दुसऱ्या स्थानी घसरण झाली आहे.

गुकेशने दुसऱ्या दिवशी सहाव्या फेरीत अनिश गिरीविरुद्ध खेळताना ५७व्या चालीनंतर बरोबरीची नोंद केली. यानंतर लेक्से सरानाविरुद्धही त्याला बरोबरीवर समाधान मानावे लागले. आठव्या फेरीत काळ्या मोहऱ्यांसह खेळणाऱ्या गुकेशने स्पेनच्या डेव्हिड अँटोनविरुद्ध विजय नोंदवला, मात्र नवव्या फेरीत त्याला उझबेकिस्तानच्या नोदिरबेक अब्दुसत्तोरोवविरुद्ध पराभवाचा सामना करावा लागला. पांढऱ्या मोहऱ्यांसह खेळणाऱ्या गुकेशने ३४व्या चालीत केलेल्या चुकीचा फटका त्याला बसला.

एरिगेसीला आर्तेमिएवकडून सहाव्या फेरीत पराभूत व्हावे लागले. यानंतर एरिगेसीने माकसिम चिगाएवविरुद्ध बरोबरी नोंदवली, तर भारताच्या नारायणनविरुद्ध विजय नोंदवला. नवव्या फेरीत ख्रिस्तोबेल हेनरिक्झविरुद्ध एरिगेसीने बरोबरीची नोंद केली. खुल्या विभागातील आता अखेरच्या चार फेऱ्या शिल्लक आहेत. आर्तेमिएवने दिवसातील धक्कादायक निकालाची नोंद करताना कार्लसनला पराभूत केले.

महिला विभागात गतविजेती कोनेरू हम्पीने ६.५ गुणांसह चीनच्या झू जिनेरविरुद्ध संयुक्तपणे अग्रस्थानी आहे. हरिका द्रोणावल्ली ही सहा गुणांसह संयुक्तपणे दुसऱ्या स्थानी आहे, तर विश्वचषक विजेती दिव्या देशमुख ५.५ गुणांसह संयुक्त तिसऱ्या स्थानावर आहे. हम्पीने दुसऱ्या दिवसाच्या चार फेऱ्यांमध्ये तीन विजय व एका बरोबरीची नोंद केली.



**पनवेल : बेलपाडा येथे गाव कप क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन भाजप महिला मोर्चा उलवे नोड अध्यक्ष तथा गव्हाण ग्रामपंचायतीच्या माजी सदस्य ॲड. योगिता सुहास भगत यांच्या हस्ते झाले. या वेळी माजी उपसरपंच विजय घरत, ज्येष्ठ नेते जयवंत देशमुख, सुहास भगत, आयोजक बेलपाडा ग्रामस्थ संतोष म्हात्रे, स्नेहल म्हात्रे, किरण म्हात्रे, सोमनाथ म्हात्रे, प्रिया म्हात्रे, महेंद्र म्हात्रे, संतोष भगवान म्हात्रे, सोमनाथ केशव म्हात्रे, प्रकाश दत्तात्रय कडू, अंकुश राम पाटील, प्रज्वल गिरीश म्हात्रे, अशोक गोविंद घरत, महेंद्र बाबू म्हात्रे, हरि रामचंद्र मढवी उपस्थित होते.**

## विराटच्या व्हिडीओसाठी बस ड्रायव्हरची भन्नाट आयडिया

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

यंदाची विजय हजारे ट्रॉफी स्पर्धा अनेक प्रकारे खास ठरत आहे. विराट कोहली आणि रोहित शर्मा सारख्या दिग्गजांच्या उपस्थितीने त्याच्या भव्यतेत भर पडली आहे. सोशल मीडियावर या दोघांचे असंख्य व्हिडीओ फिरत आहेत. यादरम्यान, एक व्हिडिओ समोर आला आहे, ज्यामध्ये दिल्ली संघाच्या बस ड्रायव्हरने विराट कोहलीचा व्हिडीओ रेकॉर्ड करण्यासाठी एक मजेदार पद्धत वापरली आहे.

दिल्लीने गुजरातविरुद्ध विजय मिळवल्यानंतर हा व्हिडीओ व्हायरल झाला. यामध्ये बस ड्रायव्हर हुशारीने स्वतःला विराट कोहलीला आणि दिल्ली संघातील इतर खेळाडूंना एकाच फ्रेममध्ये कैद करण्यासाठी त्याचा फोन एका बाजूला ठेवताना दिसत आहे. मजेशीर गोष्ट म्हणजे ड्रायव्हरने पूर्णपणे गंभीर हावभाव राखला आणि कोणताही उत्साह किंवा कौतुक दाखवले नाही, जेणेकरून कोणालाही समजू नये की शूटिंग सुरू आहे. विराटसोबत ड्रायव्हरने इशांत शर्मा आणि दिल्ली संघातील इतर अनेक खेळाडू आणि सपोर्ट स्टाफ यांना बसमधून उतरतानाही कॅमेऱ्यात कैद केले.

दरम्यान, सोशल मीडियावरील चाहत्यांनी या व्हिडिओचे कौतुक केले आणि ड्रायव्हरच्या मजेशीर अभिनयाबद्दल धमाल कमेंट्सदेखील केल्या.

## कसोटी प्रशिक्षकपदासाठी व्हीव्हीएस लक्ष्मणला विचारणा?

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या मानहानीकारक कसोटी पराभवानंतर भारतीय क्रिकेट नियामक मंडळातील (बीसीसीआय) एका वरिष्ठ व्यक्तीने माजी क्रिकेटपटू व्हीव्हीएस लक्ष्मण यांच्याशी अनौपचारिक चर्चा केली.



टीम इंडियाचा मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर याच्यासाठी २०२५ हे वर्ष विरोधाभासाचे ठरले. एकीकडे टीम इंडियाने आशिया चषक (टी–२०) आणि चॅम्पियन्स ट्रॉफी (वनडे) जिंकून मर्यादित षटकांच्या क्रिकेटमध्ये आपले वर्चस्व सिद्ध केले, तर दुसरीकडे मायदेशात झालेल्या कसोटी मालिकेत दारूण पराभव (व्हाईटवॉश) झाला. दक्षिण आफ्रिकेने भारताचा मायदेशात २–० असा 'क्लीन स्वीप' केला. २०२४मध्ये न्यूझीलंडविरुद्ध घरच्या मैदानावर झालेल्या ३–० अशा पराभवानंतर या ताज्या पराभवांमुळे गंभीर यांच्या कसोटी प्रशिक्षकपदाबाबत चर्चा सुरू आहे.

'पीटीआय'च्या वृत्तानुसार दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पराभवानंतर बीसीसीआयमधील एका वरिष्ठ व्यक्तीने माजी क्रिकेटपटू व्हीव्हीएस लक्ष्मण यांच्याशी अनौपचारिक चर्चा केली. त्यांना कसोटी संघाचे प्रशिक्षकपद स्वीकारण्यास रस आहे का, अशी विचारणा केली होती, मात्र लक्ष्मण सध्या बंगळुरू येथील 'सेंटर ऑफ एक्सलन्स'चे प्रमुख म्हणून काम करत आहेत.

### टी-२० वर्ल्डकप संधी अन् आव्हान

*गौतम गंभीरचा सध्याचा करार २०२७च्या एकदिवसीय विश्वचषकापर्यंत आहे, पण अवघ्या पाच आठवड्यांवर येऊन ठेपलेला टी–२० विश्वचषक त्याच्यासाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. भारतीय संघाने जेतेपद राखले किंवा किमान अंतिम फेरीपर्यंत मजल मारली, तर गंभीरचे स्थान भक्कम होऊ शकते, मात्र या स्पर्धेतील खराब कामगिरी गंभीरसाठी अडचणीची ठरू शकते, असे मानले जात आहे.*

## विराटची विशालला खास भेट आणि यशाचा गुरूमंत्र

**जयपूर : वृत्तसंस्था**

जयपूरमध्ये झालेल्या विजय हजारे ट्रॉफीच्या सामन्यात गुजरातला दिल्लीकडून निसटता पराभव पत्करावा लागला. २५५ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना सलामीवीरांच्या दमदार सुरुवातीनंतर दिल्लीच्या गोलंदाजांनी जोरदार पुनरागमन केल्यामुळे गुजरातचा संघ २४७ धावांवर सर्वबाद झाला. या सामन्यात गुजरात संघाचा फिरकीपटू विशाल जयस्वालने दिल्लीचे अनुभवी खेळाडू विराट कोहली, ऋषभ पंत आणि नितीश राणा यांच्या विकेट्स घेऊन क्रिकेट जगताचे लक्ष वेधून घेतले.



दिल्ली आणि गुजरात यांच्यातील सामन्यात विराट कोहली ७७ धावांवर खेळत असताना विशाल जयस्वालने त्याला आपल्या फिरकीच्या जाळ्यात ओढले. दिल्लीचा संघ हा सामना सात धावांनी जिंकला असला, तरी सामन्याची सर्व चर्चा मात्र विशाल जयस्वालच्या त्या एका विकेटभोवती फिरत होती. या अविस्मरणीय कामगिरीनंतर विराटने केवळ त्याचे कौतुकच केले नाही, तर त्याला भविष्यासाठी मोलाचा सल्लाही दिला.

सामना संपल्यावर गुजरातचे इतर खेळाडू ड्रेसिंग रूमकडे परतले, पण विशाल तिथेच थांबला. त्याने पंचांकडे त्या 'मॅच बॉल'ची मागणी केली, ज्या चेंडूवर त्याने विराटला बाद केले होते. हातात तो चेंडू घेऊन तो दिल्लीच्या ड्रेसिंग रूमकडे गेला. तिथे विराटला पाहताच तो थबकला, पण विराटनेच त्याला हसून आत बोलावले. घाबरलेल्या विशालने खिशातून चेंडू काढला आणि म्हणाला, भैय्या, या बॉलवर तुमची ऑटोग्राफ हवी आहे. कोहलीने किट बाजूला ठेवले, त्याला जवळ बसवले आणि संवाद साधला. विराट म्हणाला, तू चेंडू खूप छान टाकतोस. अशीच मेहनत करत राहा. संधी नक्की मिळेल, फक्त थोडी वाट बघ आणि सराव सोडू नकोस.

### अक्षर पटेलकडून प्रेरणा

अक्षर पटेलप्रमाणेच जयस्वालसुद्धा गुजरातच्या खेडा जिल्ह्यातील नडियादचा आहे. त्याने त्याच अकादमीतून क्रिकेटचे धडे गिरवले, जिथून भारतीय टी–२० संघाच्या उपकर्णधाराने सुरुवात केली होती. जयस्वाल अवघ्या आठ महिन्यांचा असताना त्याच्या वडिलांचे निधन झाले. मोठे होत असताना क्रिकेट त्याची आवड बनली आणि त्याने आपल्या आईला व्यावसायिक क्रिकेटपटू होण्याचे स्वप्न सांगितले. हा प्रवास सोपा नव्हता, पण त्याच्या आईने त्याला खंबीर पाठिंबा दिला. त्याचप्रमाणे जयस्वालच्या मते, अक्षर पटेलने त्याच्या कारकिर्दीला आकार देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

## विजय हजारे ट्रॉफीत विराट, रोहितला नियमानुसार मानधन

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

टीम इंडियाचे वन–डेमधील स्टार फलंदाज विराट कोहली आणि रोहित शर्मा यांनी विजय हजारे ट्रॉफीमध्ये पुनरागमन केले. या दिग्गज फलंदाज देशांतर्गत स्पर्धेत एक नवा उत्साह संचारला. यंदा विराट आणि रोहितमुळे या स्पर्धेत सहभाग जसा चर्चे ठरला तसाच त्यांना या स्पर्धेत खेळण्यासाठी किती मानधन मिळाले याबाबतही चर्चा रंगली. याबाबत चाहत्यांमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे.

विराट कोहली आणि रोहित शर्मा हे दोघेही बीसीसीआयच्या केंद्रीय करारात असलेले खेळाडू असले तरी विजय हजारे ट्रॉफीतील त्यांचे मानधन आयपीएलमधील कोट्यवधी रुपयांच्या कमाईच्या तुलनेत खूपच कमी आहे. २०२५–२६च्या हंगामासाठी खेळाडूंच्या मानधनाची रचना त्यांच्या अनुभवावर (लिस्ट–ए सामन्यांच्या संख्येवर) आधारित आहे. यात खेळाडूंचे तीन श्रेणींमध्ये विभाजन करण्यात आले आहे.





सध्याच्या हंगामात दिल्लीकडून खेळणारा विराट कोहली आणि मुंबईकडून खेळणारा रोहित शर्मा हे दोघेही ४०पेक्षा अधिक लिस्ट ए सामने खेळलेले असल्याने त्यांना प्रत्येकी ६० हजार रुपये प्रति सामना मानधन मिळले. विशेष म्हणजे, देशांतर्गत स्पर्धेत त्यांना इतर अनुभवी खेळाडूंप्रमाणेच समान मानधन दिले जाते. बीसीसीआयकडून आंतरराष्ट्रीय एकदिवसीय सामन्यासाठी या दोघांना प्रत्येकी सहा लाख रुपये मानधन दिले जाते.

विजय हजारे ट्रॉफीतील कमाई केवळ सामन्याच्या फीपुरती मर्यादित नसते. खेळाडूंना इतर माध्यमांतून अतिरिक्त उत्पन्नही मिळू शकते. यामध्ये दैनंदिन भत्ता प्रवास, भोजन आणि निवासासाठी तरतूद आहे. सामनावीर पुरस्कार जिंकणाऱ्या खेळाडूला १० हजार रुपये तसेच स्पर्धेत बाद फेरी आणि अंतिम फेरी गाठणाऱ्या संघांना मिळणारी रक्कम खेळाडू आणि सहाय्यक कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ केली जाते.

### अशी आहे मानधनाची रचना

मानधन रचना प्रतिसामना ही संघातील ११ खेळाडू, राखीव खेळाडू वरिष्ठ श्रेणीमधील (४० पेक्षा जास्त सामने), मध्यम श्रेणी (२१ ते ४० सामने) कनिष्ठ श्रेणी (० ते २० सामने) अशी आहे. विजय हजारे ट्रॉफीमध्ये सामना खेळल्यास प्रति सामना खेळाडूला ६० हजार रुपये आणि राखीव खेळाडूला ३० हजार रुपये मिळतात. मध्यम श्रेणी खेळलेल्या खेळाडूंचा संघात समावेश झाल्यास ५० हजार रुपये आणि राखीव खेळाडूस २५ हजार रुपये मिळतात, तर कनिष्ठ श्रेणीतील खेळाडूंना प्रति सामना ४० हजार रुपये आणि राखीव खेळाडूंना २० हजार रुपये मिळतात.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com